रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ • अंक १३८

www.ramprahar.com

• शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२


## रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन भारतात दाखल, पीएम मोदींकडून स्वागत



**नवी दिल्ली :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आपल्या दोन दिवसीय महत्त्वाच्या भारत दौऱ्यासाठी गुरुवारी (दि. ४) नवी दिल्लीत दाखल झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः पालम विमानतळावर पुतिन यांचे स्वागत केले. जागतिक स्तरावर अनेक भू-राजकीय बदल होत असताना आणि विशेषतः भारताचे अमेरिकेसोबतचे संबंध तणावपूर्ण झाले असताना पुतिन यांच्या या २३व्या वार्षिक शिखर परिषदेकडे संपूर्ण जगाचे बारकाईने लक्ष लागले आहे. शुक्रवारी होणाऱ्या शिखर परिषदेत द्विपक्षीय व्यापार वाढवणे, संरक्षण सहकार्याला अधिक बळकटी देणे आणि महत्त्वाचे म्हणजे बाह्य दबावापासून द्विपक्षीय व्यापाराचे रक्षण करणे यावर भर दिला जाईल. दोन्ही देशांनी २०२५पर्यंत व्यापाराचा आकडा १०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. पुतिन यांचा हा दौरा भारत-रशिया भागीदारीला एक नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे.


### अंतरंग

रायगड जिल्ह्यात ४५४ कुपोषित बालके आढळली/२

सोन्याच्या दागिन्यांचा डबा चोरणाऱ्या दोघींना अटक/५

गणेश तोटेची आशियाई पॉवरलिफ्टिंगसाठी निवड/८


## आजपासून पनवेलमध्ये महाअंतिम फेरी : नाट्य-सिने क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या १२व्या स्पर्धेची महाअंतिम फेरी ५, ६ व ७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

राज्यभरातून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका तीन दिवसांच्या महाअंतिम फेरीत सादर होतील. विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे तसेच ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते व निर्माते सुनील बर्वे यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. ५) सकाळी ९ वाजता पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते होणार आहे. सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, राजू सोनी, तेजस कांडपिळे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष रूचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज उपस्थित राहणार आहेत.




पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. ७) सायंकाळी ४ वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या वेळी गौरव रंगभूमीचा पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी व सुनील बर्वे, सन्माननीय म्हणून माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तर प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेते जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष अमर पाटील, कामोठे अध्यक्ष विकास घरत, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदींची उपस्थिती असणार आहे.

बक्षीस वितरणाच्या दिवशी प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री सूत्रसंचालन करणार आहेत तसेच हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट; त्याचबरोबर हास्यसम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होईल.

महाअंतिम फेरीच्या एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील व टीम अटल करंडक यांनी केले आहे.

# डिजिटल ७/१२ला कायदेशीर मान्यता

### राज्याच्या महसूल विभागाचे महत्त्वपूर्ण पाऊल

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने जमिनीच्या ७/१२बाबत महत्त्वाचा निर्णय घेत त्याला कायद्याचे संरक्षण दिले आहे. या विषयीचे शासन परिपत्रक जारी करण्यात आले असून याचा राज्यातील जनतेला फायदा होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची माहिती दिली.

मंत्री बावनकुळे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, डिजिटल ७/१२, ८-अ आणि फेरफार उतारे कायदेशीरदृष्ट्या वैध ठरवण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

या निर्णयामुळे डिजिटल ७/१२ला अधिकृत मान्यता, फक्त १५ रुपयांमध्ये अधिकृत उतारा उपलब्ध होणार असून तलाठ्याच्या सही-स्टॅम्पची गरज संपुष्टात आली आहे. डिजिटल स्वाक्षरी, क्यूआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांक असलेले ७/१२, ८-अ व फेरफार उतारे सहज उपलब्ध होणार आहेत. सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग व न्यायालयीन कामांसाठी हे डिजिटल सातबारे पूर्णपणे वैध असणार आहेत. हा निर्णय शेतकरी, जमीनधारक आणि सामान्य नागरिकांसाठी सुविधा देणारा आहे. आमचे सरकार पारदर्शकता आणि वेगवान सेवा यांचा नवा अध्याय लिहितंय. राज्यातील जनता या निर्णयाचे स्वागत करेल याची मला खात्री आहे, असा विश्वासही मंत्री बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

अधिकृत सातबारा मिळवण्यासाठी लोकांना तलाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. परंतु आता सरकारच्या नव्या निर्णयामुळे तलाठी कार्यालयाचे हेलपाटे न मारता उतारे मिळणार आहेत.

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम एप्रिल २०२६च्या आत पूर्ण केले जाईल -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी मुंबई-गोवा महामार्गाचे काम एप्रिल २०२६च्या आत पूर्ण केले जाईल. यात कोणतीही दिरंगाई होणार नाही, असे लोकसभेत बोलताना गुरुवारी (दि. ४) सांगितले.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की,



मुंबई-गोवा महामार्गाचे काम मागच्या सरकारच्या काळात २००९मध्ये सुरू झाले. अनेक कंत्राटदार बदलले गेले. जमीन अधिग्रहणाचीही समस्या होती, पण आतापर्यंत ८९.२९ टक्के काम पूर्ण झाले आहे. एप्रिल २०२६च्या आत महामार्ग पूर्ण केला जाईल.

टोल आणि वाहनांच्या रांगा याबद्दल ना. गडकरी म्हणाले की, राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन अंतर्गत नवी प्रणाली विकसित केली आहे. यामुळे रोख व्यवहार किंवा थांबण्याची आवश्यकता भासत नाही. सध्या ही नवीन प्रणाली देशभरात सुमारे १० ठिकाणी आहे. पुढील वर्षात ती राष्ट्रीय महामार्ग नेटवर्कवर असेल.

### निवडक

#### बॉम्बची धमकी; अहमदाबादमध्ये विमानाचे आपत्कालीन लँडिंग

**अहमदाबाद :** मदिनाहून हैदराबादला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली. यानंतर विमानाचे अहमदाबादमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. या विमानात १८० प्रवासी आणि सहा क्रू मेंबर्स होते. बॉम्ब निकामी पथकाने विमानाची कसून तपासणी केली, पण कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

#### महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष रेल्वेगाड्या धावणार

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत येणाऱ्या अनुयायांसाठी मध्य रेल्वेने ४ ते १२ डिसेंबर या काळात १५ अनारक्षित विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर ते मुंबई, कलबुर्गी ते मुंबई, अमरावती ते मुंबई आणि कोल्हापूर ते मुंबई मार्गावर या विशेष गाड्या धावतील. याशिवाय कल्याण ते परळ मार्गावरही १२ अतिरीक्त रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत.



**पनवेल : श्रीपाद श्रीवल्लभ दत्तगुरूंची जयंती गुरुवारी भक्तिभावाने साजरी झाली. यानिमित्ताने पहाटेपासूनच विविध दत्त मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी पहायला मिळाली. अभिषेक, पूजन, आरती, नामस्मरण, भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांनी वातावरण मंगलमय झाले होते. दत्त जयंतीचे औचित्य साधून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विविध मंदिरांना भेट देत दत्तगुरूंचे दर्शन घेतले आणि सर्वांना दत्त जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.** (वृत्त पान ३ वर..)

### गुरू तेग बहादूर यांचा ३५०वा शहिदी समागम

## ‘आरम्भता की अरदास’ने कार्यक्रमाची सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंद की चादर गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त २१ डिसेंबर रोजी खारघर येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजातील प्रतिनिधी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असणार आहे. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाची सुरुवात अर्थात आरम्भता की अरदास ही रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ४) झाली.



खारघर कॉर्पोरेट पार्क येथे झालेल्या या कार्यक्रमास क्षेत्रिय आयोजन समिती नवी मुंबईचे अध्यक्ष अमरपाल सिंग रंधावा, सुप्रीम कौन्सिल तथा नवी मुंबई गुरूद्वाराचे अध्यक्ष जसपाल सिंग सिद्धू, खारघर गुरुद्वाराचे अध्यक्ष परमजित सिंग बल, महाराष्ट्र राज्य सिख समन्वय समितीचे चरणदीप (हॅप्पी) सिंग यांच्यासह सिंग समाजाचे अध्यक्ष लड्डू राम नागवाणी, निमंत्रक तथा राज्यस्तरीय समिती तथा कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य पंजाब अकॅडमीचे मिलकित सिंग बल, उपजिल्हाधिकारी रायगड रवींद्र राठोड उपस्थिती होते. (पान २ वर..)

## शिवाजीनगर येथे अखंड हरिनाम सप्ताह



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील देवसागर साधक समाज श्री स.स. बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिर येथे मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दत्त जयंतीपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्यासह इतर मान्यवरांनी भेट देऊन दर्शन घेतले.

### मान्यवरांनी घेतले दर्शन

श्री बाळकृष्ण महाराजांच्या पादुकांचे पूजन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याने सप्ताहाचा प्रारंभ झाला. सप्ताहादरम्यान भजन, प्रवचन, कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. बाळकृष्ण महाराजांच्या १२५व्या जयंतीनिमित्त दिंडी सोहळा झाला, तर श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजनदेखील करण्यात आले होते. माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि अर्चना ठाकूर यांच्या हस्ते ही पूजा झाली. (पान २ वर..)






# रायगडात ४५४ कुपोषित बालके आढळली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाने केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यातल ४५४ कुपोषित बालके आढळली आहेत. ज्यात ६१ तीव्र तर ३९३ मध्यम कुपोषित बालकांचा समावेश आहे. आदिवासी बहुल कर्जत, रोहा, माणगाव, पोलादपूर, पेण, महाड या तालुक्यात कुपोषित बालकांचे प्रमाण अधिक आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागा मार्फत रायगड जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील १६ प्रकल्पातील ३ हजार १६१ अंगणवाड्यांचे तसेच मिनी अंगणवाड्यातील मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. यात एकुण १ लाख ६ हजार १३० बालकांची तपासणी करण्यात आली.

यापैकी ९८ हजार ७८० मुलांचे वजन घेण्यात आले. या सर्वेक्षणात तीव्र कुपोषित श्रेणीतील ६१ बालके, सौम्य कुपोषित श्रेणीतील ३९३ बालके आढळून आली. आदिवासी समाजात होणारे बालविवाह, बेरोजगारी, आदिवासींचे रोजगारासाठी स्थलांतरण, त्यामुळे मुलांची होणारी अबाळ ही कुपोषणा मागची काही प्रमुख कारणे आहेत.

कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी महिला बाल कल्याण विभागाने एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू केली आहे. या योजनेनुसार कुपोषित बालके, स्तनदा माता आणि गरोदर महिलांना आठवड्यातून एक दिवस अतिरीक्त आहार पुरवला जातो आहे. मात्र तरीही रायगड जिल्ह्यातील कुपोषणाच्या प्रमाण घटलेले नाही.

**कुपोषित बालकांचे नियमित सर्वेक्षण केले जात आहे. यात कुपोषित आढळणाऱ्या बालकांना पोषण आहार दिला जातोय त्याच बरोबर तीव्र कुपोषित बालकांवर बालसंगोपन केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निगराणीत उपचार सुरु आहेत. त्यामुळे सॅम श्रेणीतील १५ तर मॅम श्रेणीतील १०१ बालकांमध्ये सुधारणा झाली आहे.**

**–निर्मला कुचिक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण विभाग, रायगड जि.प.**

## माणगावजवळ अपघातात महिलेचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे, माणगाव, दिघी महामार्गावर अपघाताचे सत्र सुरूच आहे. तालुक्यातील मौजे सणसवाडी गावच्या हद्दीत मारुती सुझुकी वॅगनार गाडीची डिव्हायडरला धडक लागून अपघात झाल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.




पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. ४ डिसेंबर रोजी माधव मेहता हे त्यांचे मालकीची मारुती सुझुक वॅगनार गाडी स्वतः चालवित घेवुन जात असताना ताम्हीणी घाट मार्गे जात असताना मौजे सणसवाडी गावच्या हद्दीत टी. पॉईंट पुढे सकाळी १० वाजता आल्यावेळी अचानक त्यांचे कार समोर कुत्रा आल्याने त्यांनी कार रोडच्या उजव्या बाजुला घेतली असता रोडच्या कडेला असलेल्या डिव्हाडरला कारची ठोकर लागुन अपघात झाला.

या अपघातात त्यांच्या पत्नी निलीमा मेहता, वय ७० वर्षे, यांच्या तोंडाला, उजव्या हाताच्या कोप–याला गभीर दुखापत होऊन उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

## ढगाळ वातावरणामुळे कडधान्य पिके धोक्यात

**तळा : प्रतिनिधी**

वातावरणीय बदलांमुळे व सध्या ढगाळ वातावरण असल्याने कडधान्य पिके धोक्यात येण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

तळा तालुक्यातील बोरघरहवेली, सोनसडे, महागाव, भानंग, गिरणे, मांदाड, तळेगाव विभागात भात कापणी, बांधनी, झोडणी सोबतच वालाच्या शेतीमध्ये वाल, मुग, हरभरा, तुर, चवळी, मटकी इत्यादी कडधान्य पिकाची लागवड शेतकऱ्यांनी करण्यास सुरुवात केली.ती रोपे आता हिरवीगार झाली असून चांगली टुमदार आहेत. अनेक शेतकऱ्यांनी ही लागवड कृषी विभागातील अधिकारी वर्गाच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.त्यामुळे या कडधान्याच्या पिकांना योग्य वाढ होऊन चांगले पिक येण्यास मदत होणार आहे.

पिकांची काळजी कशी घ्यावी,खतांचे प्रमाण कसे द्यावे ही सर्व माहिती यामुळे शेतकऱ्यांना मिळते.आता शेतात रोपे वर चांगली झाली असून ती चांगली तजेलदार असून त्यातून चांगले पिक कडधान्याचे येईल असे शेतकरीवर्गातून बोलले जात आहे.

थंडीची सुरूवात झाली कडधान्य पिके वाढण्यास पोषक वातावरण असताना अचानक दोन दिवस ढगाळ वातावरण असल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे. हवामान चांगले राहो . असे शेतकरीवर्ग बोलत आहेत.निसर्गाने चांगली साथ दिली तर कडधान्याची शेती चांगली बहरून पीक चांगले येईल



## कामोठे भूखंड प्रकरणात माझा कोणताही गैरव्यवहार नाही!

### गणेश वाघिलकरकडून पैशाची मागणी आणि बदनामीचा सतत प्रयत्न; माजी नगरसेवक सुनील बहिरा यांचा खुलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वडिलोपार्जित जमिनीचे सिडकोकडून संपादन झाल्यानंतर कुटुंबाला साडेबारा टक्के योजनेअंतर्गत मिळालेल्या भूखंडासंदर्भात माझ्यावर केलेले सर्व आरोप निराधार असून माझा या व्यवहारात कुठलाही गैरव्यवहार नाही, असा स्पष्ट खुलासा माजी नगरसेवक सुनील बहिरा यांनी केला आहे.

तक्का (पनवेल) येथील वडिलोपार्जित जमिनीचे संपादन झाल्याने सिडकोने कामोठे येथे साडेबारा टक्के अंतर्गत भूखंड दिले होते. त्यावेळी वडील हयातीत नसल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आणि सर्वस्वी अधिकार माझे मोठे भाऊ चंदर बहिरा यांना देण्यात आले होते. त्यावेळी मी लहान असल्याने मला या व्यवहाराची कुठलीही पूर्णता कल्पना नव्हती तसेच या सर्व प्रकारात आमच्याकडून सिडकोची कोणतीही फसवणूक झाली नाही. उलटपक्षी सिडकोकडून अद्याप आम्हाला दोन प्लॉट येणे बाकी आहे. अशातच लोकांच्या व्यवहारात नाक खुपसणाऱ्या आणि त्यातून आर्थिक मलिंदा शोधणाऱ्या गणेश वाघीलकरने कायम माझी बदनामी केला असल्याचा खुलासा माजी नगरसेवक सुनील बहिरा यांनी केला आहे.

सिडकोच्या कामोठे परिसरातील मौल्यवान भूखंड बळकावण्यासाठी मृत भावाला 'जिवंत' दाखवत बनावट कागदपत्रांची रांगोळी उभी केली अशा आशयाची बातमी काही वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याने या बाबतीत सुनील बहिरा यांनी वस्तुस्थिती मांडत आपल्याला विनाकारण त्रास देण्यासाठी आणि समाजात असलेली प्रतिष्ठा कमी करण्यासाठी गणेश वाघीलकर यांच्याकडून वारंवार प्रयत्न होत असल्याचे सांगण्यात आले. सुनील बहिरा यांनी या संदर्भात खुलासा करताना सांगितले कि, आमची एकत्रित कुटुंबाची वडिलोपार्जित जमीन पनवेल येथे होती. या जमिनीचे सिडकोने संपादन केले त्या अनुषंगाने आम्हाला साडेबारा टक्के योजनेतून १३०० चौरस मीटरचा प्लॉट मिळणार होता. त्यापैकी ११०० चौरस मीटरचा भूखंड कामोठे सेक्टर ३५ येथे देण्यात आला.

वडील गोविंद काथोड बहिरा यांचे १९७७ साली निधन झाल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी कुटुंबातील मोठा भाऊ चंदर गोविंद बहिरा यांच्यावर आली होती. आणि त्यानुसार कुटुंबाची जबाबदारी आणि सर्व अधिकार कुटुंबांनी त्यांना दिली होती. त्याच अनुषंगाने या जमिनीच्या संदर्भातील मुखत्यारपत्र अर्थात पॉवर ऑफ अटर्नी त्यांना देण्यात आली होती. २००६ साली या जमिनीचा व्यवहार झाला होता आणि त्यावेळी विशेषत्वाने अशा व्यवहारांची आपल्याला कुठलीच कल्पना आत्मसात नव्हती त्याचबरोबर सर्वाधिकार मोठ्या भावाला दिल्याने त्यामध्ये दुमत नव्हते. त्यावेळी कुटुंबातील सदस्य म्हणून मी भावाने बोलावल्याप्रमाणे स्वतःच्या नावावर आपली सही दिली आणि बाकीच्या व्यवहारात ढवळाढवळ केली नाही. त्यामुळे मी या व्यवहारात काहीही खोटे केले नाही हे स्पष्ट झाले आहे.


मात्र मी माझ्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह करण्यासाठी काहीही व्यावसायिक कामे हाती घेतली कि गणेश वाघिलकर हा इसम वारंवार आडमुठी भूमिका घेऊन सततचा नाहक त्रास देण्याचा प्रयत्न करत असतो. त्याने गावातील इसमांना मध्यस्थी टाकून अनेकदा माझ्याकडे पैशाची मागणी केली मात्र मी पैसे देत नसल्याने त्याने माझ्या विरोधात वैयक्तिक राग काढून विविध प्रशाशनाकडे सातत्याने तक्रारी अर्ज केले आहेत. पण या माध्यमातून गणेश वाघिलकरला सांगू इच्छितो कि, तू कितीही मला त्रास देण्याचा आणि कोणत्याही प्रकरणात गुंतविण्याचा प्रकार केला तरी मी तुझ्या कपटी मनसुब्यांना भीक घालणार नाही हे लक्षात घे. मी काहीही खोटे केले नाही त्यामुळे त्याला पैसे देण्याचा संबंध येत नाही. माझे नाव कुटुंबातील सदस्य म्हणून कागदपत्रांवर आहे, प्रत्यक्षात या प्रकरणाशी त्यांचा काहीही संबंध नाही आणि असे असताना गणेश वाघिलकर कडून वेगवेगळ्या गैरसमजांना वाव देण्याचा, कुटुंबात तेढ निर्माण करण्याचा आणि सामाजिकदृष्टया मला नाहक बदनाम करण्याचा व त्याला खतपाणी देण्याचा प्रयत्न केला जात आहे, असेही सुनील बहिरा यांनी स्पष्ट केले.

गणेश वाघिलकरवर महिलांची छेडछाड केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात कलम ३५४ नुसार गुन्हा दाखल आहे आणि त्याचा द्वेष घेऊन तो माझ्या विरोधात कुरापती करत असतो. या सर्व प्रकरणी योग्य तो कायदेशीर सल्ला घेऊन कायदेशीर कार्यवाही मी सुरु करत आहे. तसेच जाणीवपूर्वक माझी बदनामी व माझ्यावर चुकीची फौजदारी तक्रार केल्याबद्दल योग्यवेळी कायदेशीर कारवाई करणार आहे, असेही माजी नगरसेवक सुनील बहिरा यांनी नमूद केले.

## रातवड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कंपनीत शैक्षणिक क्षेत्रभेट

**माणगाव : प्रतिनिधी**

माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट बुधवार दिनांक ३ डिसेंबर रोजी पोस्को कंपनीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. उद्योगजगताची प्रत्यक्ष ओळख, कंपनीतील कार्यप्रणाली व विविध सामाजिक उपक्रमांचा जवळून अभ्यास करण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली होती.



विद्यार्थ्यांचे स्वागत कंपनीतर्फे अतिशय आदरातिथ्यपूर्वक करण्यात आले. प्लांटची सुसज्ज इमारत, स्वच्छ परिसर, अत्याधुनिक यंत्रणांनी सज्ज उत्पादन केंद्र पाहून विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील शिस्त, सुरक्षितता आणि कार्यसंस्कृतीची प्रत्यक्ष अनुभूती मिळालीभेटीदरम्यान कंपनीचे व्यवस्थापक महेंद्र थत्ते,सीएसआर प्रमुख कुलदीप पुरंदरे तसेच स्वप्निल पाटील, आसावरी जोशी, इंजिनियर आदित्य पाटील आणि ज्ञानदेव देवकर यांनी विद्यार्थ्यांना प्लांटमधील विविध विभागांची सविस्तर माहिती दिली. उत्पादन प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा – कच्चा माल तपासणी, प्रक्रिया विभाग, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग व डिस्पॅच – यावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निरीक्षणाची संधी मिळाली. कंपनीच्या सीएसआर उपक्रमांची माहिती देताना शिक्षण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, स्थानिक रोजगारसंधी अशा विविध क्षेत्रांत पोस्को करत असलेल्या कार्याची ओळख करून देण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षितता नियम आणि औद्योगिक व्यवस्थापन पद्धती यांचा अभ्यास विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक ठरला. भेटीनंतर कंपनीतर्फे विद्यार्थ्यांसाठी भोजनाची सोय करण्यात आली. भोजनोत्तर विद्यार्थ्यांनी आपल्या जिज्ञासू प्रश्नांद्वारे अधिकारी व इंजिनियरांशी संवाद साधत औद्योगिक क्षेत्रातील संधी, करिअर मार्ग आणि तांत्रिक कौशल्यांविषयी मोलाची माहिती मिळवली. ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली असून औद्योगिक क्षेत्राचे प्रत्यक्ष ज्ञान, शिस्तबद्ध कामपद्धती व तंत्रज्ञानाची ओळख त्यांच्या शैक्षणिक प्रवासात निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. शिक्षक अजित शेडगे, श्रीकृष्ण गर्धे यांनी या भेटीचे नियोजन केले होते.

## तळा येथे दिव्यांग दिन उत्साहात; विविध वस्तूंचे वाटप

**तळा : प्रतिनिधी**

पंचायत समिती तळा यांचे माध्यमातून डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती तळा येथे दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात तहसिलदार स्वाती पाटील यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,दिव्यांग संघटनेचे पदाधिकार,आरोग्य अधिकारी ,समावेशित शिक्षण अंतर्गत काम करणारे श्री.शिरसाट,शैलजा साठे,श्री.भंडागे ,दिव्यांग विद्यार्थी,पालक,दिव्यांग आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहण्यांनी आपले विचार व्यक्त करताना दिव्यांगांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ देण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्न करु असे म्हटले.आज दिव्यांग दिनाच्या कार्यक्रमात शिक्षण विभागा मार्फत दिव्यांग विदयार्थ्यांना साहीत्य देण्यात आले,



पान १ वरुन

### 'आरम्भता की अरदास' ने कार्यक्रमाची सुरुवात

गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर येथे २१ डिसेंबरला भव्य कार्यक्रम होत असून आपण भाग्यवान आहोत की, या कार्यक्रमाचे नियोजनाची संधी आपल्याला मिळाली आहे. या कार्यक्रमाला शिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजातील प्रतिनिधी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असणार आहे. प्रशासनाच्या समन्वयाने या शहिदी कार्यक्रम उत्साहात होणार असल्याची ग्वाही देत जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, गुरू तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतिक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव करण्यात येणार आहे. या समागम कार्यक्रमामुळे समाजाच्या गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरू बंधूत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बलकित सिंग यांनी, युवा पिढीपर्यंत गुरू तेग बहादूर यांचे कार्य पोहचविण्यासाठी राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग कार्यरत असून हिंद की चादर गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर आणि खारघर येथे होणार आहे, असे सांगून आपल्या सर्वांच्या समन्वयाने कार्यक्रम यशस्वी करूया, असे आवाहन केले.

### शिवाजीनगर येथे अखंड हरिनाम सप्ताह

या सप्ताहावेळी भरत ठाकूर, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी उपरपंच विजय घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, संजय भगत, विनोद म्हात्रे, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, भाजप पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांच्यासह अन्य मान्यवर, ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते. हा सप्ताह ५ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.





## भारतीय रेल्वे तत्काळ तिकिट बुकिंगसाठी ओटीपी–आधारित प्रमाणीकरण करणार सुरू

**रोहे : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वे ६ डिसेंबर पासून मध्य रेल्वेवरील गाड्यांमध्ये तत्काळ तिकिट बुकिंगसाठी नवीन ओटीपी–आधारित प्रमाणीकरण प्रणाली लागू करणार आहे. ही नवीन प्रणाली संगणकीकृत पीआरएस काउंटर, अधिकृत एजंट आणि आयआरसीटीसी वेबसाइट/ॲपद्वारे बुक केलेल्या तत्काळ तिकिटांसाठी लागू असेल. या प्रक्रियेअंतर्गत, प्रवाशांना बुकिंगच्या वेळी दिलेल्या मोबाइल नंबरवर एक वेळ वापरायचा पासवर्ड (ओटीपी) मिळेल. यशस्वी ओटीपी पडताळणीनंतरच तत्काळ तिकिट जारी केले जाईल.या उपाययोजनेचा उद्देश पारदर्शकता आणखी वाढवणे, गैरवापर रोखणे आणि तात्काळ कोट्यातील बुकिंगचा लाभ योग्य प्रवाशांना मिळावा याची खात्री करणे हा आहे.

ही सुविधा ६ डिसेंबर पासून लागु करण्यात आलेल्या गाड्यांमध्ये १२२१९ लोकमान्य टिळक टर्मिनस – सिकंदराबाद दुरांतो एक्स्प्रेस, १२२२१ पुणे – हावडा दुरांतो एक्सप्रेस, १२२२३ लोकमान्य टिळक टर्मिनस– एर्नाकुलम जंक्शन दुरांतो एक्सप्रेस, १२२६१ छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस– हावडा दुरांतो एक्सप्रेस, १२२६३ पुणे – हजरत निजामुद्दीन जंक्शन दुरांतो एक्सप्रेस, १२२८९ छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस – नागपूर दुरांतो एक्सप्रेस, १२२९० नागपूर – छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस दुरांतो एक्सप्रेस, १२२९३ लोकमान्य टिळक टर्मिनस – प्रयागराज दुरांतो एक्सप्रेस, १२२९८ पुणे – अहमदाबाद जंक्शन दुरांतो एक्सप्रेस, २०१०१ नागपूर – सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेस, २०६७० पुणे – हुबळी जंक्शन वंदे भारत एक्सप्रेस, २०६७३ छत्रपती शाहू महाराज टर्मिनस कोल्हापूर – पुणे वंदे भारत एक्सप्रेस, २०६७४ पुणे – छत्रपती शाहू महाराज टर्मिनस वंदे भारत एक्सप्रेस, १२०२५ पुणे – हैदराबाद शताब्दी एक्सप्रेस, २२२२१ छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई – हजरत निजामुद्दीन जंक्शन राजधानी एक्सप्रेस (दि. ०५.१२.२०२५ पासून), १२०२५ पुणे – हैदराबाद शताब्दी एक्सप्रेससाठी ही व्यवस्था ०१.१२.२०२५ पासूनच लागू करण्यात आलेली आहे. मध्य रेल्वे प्रवाशांना विनंती करीत आहे की, गैरसोय टाळण्यासाठी तात्काळ तिकीट बुकिंग करताना आपला मोबाईल क्रमांक अचूकरीत्या नमूद करावा.

### दुखवटा

**भास्कर जोशी**



**म्हसळा :** शहरातील ब्राह्मण समाजाचे माजी अध्यक्ष भास्कर उर्फ तात्या पुरुषोतम जोशी यांचे वयाचे ८९ व्या वर्षी आज सायंकाळी ६.३० वा.अल्पशा आजाराने रहाते घरी निधन झाले. त्यांचे पश्चात दोन भाऊ, मुलगा, मुलगी, जावई, सून, नातवंडे, पतवंडे आसा परिवार आहे. भास्कर तात्या हे व्यवसायाने बागायतदार शेतकरी होते, तालुक्यांतील सुमारे २० गावांतून ते भिक्षुकी व्यवसाय करीत होते. तात्यानी म्हसळा शहरांत ब्राह्मण सभेच्या शाखेची स्थापना केली. सलग १५ वर्षे ते ब्राह्मणसभेचे अध्यक्ष होते.

# तृतीयपंथीयांवर गुन्हे शाखेची कारवाई





**पनवेल : वार्ताहर**

उरण फाटा सर्व्हिस रोड आणि कळंबोली स्टील मार्केट येथील १० तृतीयपंथीयांवर गुन्हे शाखेने कारवाई केली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात तृतीयपंथीयांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी कक्षाकडील अधिकारी व अंमलदार यांच्या दोन टिम तयार करून नवी मुंबई आयुक्त परिसरातील उरण फाटा सर्व्हिस रोड व कळंबोली स्टील मार्केट रोड येथे तोकडे कपडे परिधान करून रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना टाळ्या वाजवुन हातवारे, बिभत्स हावभाव व अश्लिल चाळे करत असताना मिळुन आल्या.

यावरून उरण फाटा सर्व्हिस रोड येथुन पाच तृतीयपंथी तसेच कळंबोली स्टील मार्केट रोड येथुन पाच तृतीयपंथी ताब्यात घेवुन त्याच्या विरूध्द सीबीडी व कळंबोली पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, सहाय्यक निरीक्षक राजश्री शिंदे, उपनिरीक्षक सरिता गुडे, शिपाई ठाकूर, चव्हाण, पारासुर, महिला पोलीस नाईक अडकमोल, भोये, चालक पोहवा हांडे यांनी केली आहे.

# पनवेल ते शिर्डी पालखी

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले दर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओमश्री साई भक्त मंडळ पनवेल यांच्यावतीने पनवेल ते शिर्डी पालखीसह पदयात्रा सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. या सोहळ्यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी गावदेवी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी ही या पालखी सोहळ्याला भेट देऊन दर्शन घेतले.

हा सोहळा पनवेलची मानाची पालखी म्हणून ओळखला जात असून यंदा याचे १५ वे वर्ष आहे. या सोहळ्याला बुधवारी (दि.३) पनवेल येथील गावदेवी मंदिरापासून उत्साहात सुरुवात झाली. अनेक साईभक्त या पालखीत सहभागी झाले असून, ही पदयात्रा ११ डिसेंबर रोजी शिर्डी येथे पोहोचणार आहे. या सोहळ्याच्या प्रस्थानावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी गावदेवीचे मनोभावे दर्शन घेतले आणि पालखी व पदयात्रा सोहळयाला शुभेच्छा दिल्या तसेच साई भक्तांशी संवाद साधून त्यांना सुखकर प्रवासासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

या वेळी भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, जयदीप भगत, मंगेश भगत, दिलीप भगत, सुरेश भगत, प्रथम भालेकर, हर्षद खंडाळकर, सुमित दसवते यांच्यासह अनेक मान्यवर आणि साई भक्त उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी झालेल्या विज्ञान प्रदर्शनात ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी अनेक कल्पक वैज्ञानिक प्रकल्प सादर केले. शाळेतील आंतरगृह विज्ञान प्रदर्शन दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी शाळेच्या बहुउद्देशीय सभागृहात मोठ्या उत्साहात झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे तेजस कदम (माजी नगरसेवक, पीएमसी) तसेच आमचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन विज्ञानाचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. शिक्षक आणि विद्यार्थी यांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या प्रतिभा व नवकल्पनांनी सजलेले आकर्षक सादरीकरण पाहिले.

इयत्ता पाचवी ते दहावीपर्यतच्या विद्यार्थ्यांनी सुमारे ६० कार्यरत नमुने व प्रकल्प सादर केले. हे प्रकल्प पुनर्नवनीकरणीय उर्जा, पर्यावरण संवर्धन, साधी यंत्रे, रोबोटिक्स, शेती, तंत्रज्ञान आणि अवकाशशास्त्र अशा विविध विषयांवर आधारित होते. प्रत्येक गटाने आकर्षक आणि माहितीपूर्ण फलक, चार्ट व सादरीकरणे तयार करून आपल्या नमुन्यांमागील वैज्ञानिक सिद्धांत स्पष्ट केले.

विजेत्या संघांना पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात आले. प्रदर्शनाचा समारोप सौ. प्राची यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. विज्ञान प्रदर्शन कार्यक्रम आमच्या पर्यवेक्षिका स नीरजा मॅडम आणि विज्ञान विभाग प्रमुख स्वाती काळे तसेच इतर विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पाडण्यात आला.

या वेळी निलिमा शिंदे (मुख्याध्यापिका इंग्रजी - प्राथमिक), सौ निरजा अदुरी (पर्यवेक्षिका इंग्रजी माध्यमिक), वैशाली पारधी (पर्यवेक्षिका इंग्रजी पूर्व प्राथमिक), तसेच सर्व विज्ञान शिक्षक उपस्थित होते. सर्व प्रकल्पांचे परिक्षण ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक माधुरी पाटील आणि तृप्ती जोशी मॅडम यांनी केले. प्रदर्शनात एकूण ६० प्रकल्प सादर करण्यात आले यातून प्रत्येक गटातून ३- ३ उत्कृष्ट प्रकल्प म्हणून निवडण्यात आले.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व या विषयावर आधारित विज्ञान प्रदर्शन गुरुवारी (दि.४) चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात विज्ञान मंडळातर्फे आयोजित करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन सीकेटी जुनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी केले.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनाला इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर सर, उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे सर, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे तसेच पालक शिक्षक संघाच्या सहसचिव स्नेहा जोशी आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी स्व मेहनतीने नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक दळणवळण, संसाधन व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन अशा विविध विषयांवर आधारित चल प्रतिकृती तयार केल्या होत्या. सर्व प्रतिकृतींचे परीक्षण खंडेराव गायकवाड प्राध्यापक उच्च माध्यमिक विभाग) यांनी केले.

फलक लेखन हेमंत कोळी, निवेदन सारिका दिवेकर तसेच सर्व विज्ञान शिक्षक सहकारी तनुजा मोरे, विद्या मावलीकर, शमिका मोरे, वनिता नाटेकर, मीलन म्हात्रे, वसुधा खरमाटे मॅडम, शमिका मोरे, सुबोध दिवेकर व इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



# एमएनएम विद्यालयात दंतचिकित्सा शिबिर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ए.टी.जी हेल्थकेअर फाउंडेशन व शासकीय दंत वैद्यक हॉस्पिटल, कॉलेज फोर्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय विद्यार्थी दंत तपासणी शिबिराचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी केले तसेच एटीजी फाउंडेशनच्या अश्विनी विश्वास गिरी स्वागत केले. शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे तसेच प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी इतर डॉक्टरांचे स्वागत केले. या वेळी डॉक्टरांनी दंत आरोग्य बद्दलचे सामान्य नियम, दात घासायच्या पद्धती यांचे प्रात्यक्षिक देखील विद्यार्थ्यांना करून दाखविले.

विद्यार्थ्यांनी चॉकलेट, जंक फूड, शीतपेय यांचे सेवन शक्यतो टाळावे जेणेकरून विद्यार्थ्यांचे दंत आरोग्य चांगले राहील, असे देखील नमूद केले. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या बाराशे विद्यार्थ्यांची दंत तपासणी तसेच सल्लादेखील शिबिरामध्ये देण्यात आला. शिबिरामध्ये दहा डॉक्टरांच्या चमूने विद्यार्थ्यांची दंत तपासणी केली.

# दत्त जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले दर्शन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दत्त जयंतीचे औचित्य साधून पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी तालुक्यातील विविध मंदिरांना भेट देत मनोभावे दर्शन घेतले. प्रत्येक ठिकाणी भाविक आणि मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले. त्यांनी सर्वांना दत्त जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सर्वप्रथम गव्हाण गावातील दत्त मंदिरात आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले.

मंदिर परिसर फुलांनी सजविण्यात आला होता तर भाविकांनी जय दत्त च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून सोडले होते. या वेळी भाजपचे नेते जयवंत देशमुख, किरण देशमुख, शेखर देशमुख, तसेच ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या उषा देशमुख यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते. स्थानिकांच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक झाला. यानंतर असुडगाव येथील पनवेल शहर वाहतूक पोलीस शाखेद्वारे आयोजित श्री दत्त जयंती सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर सहभागी झाले. त्यांनी दत्तदर्शन घेतल्यानंतर पोलिसांच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

या वेळी पनवेल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, वाहतूक पोलीस शाखेचे अधिकारी औदुंबर पाटील, उमेश इनामदार, केदार भगत, प्रीतम (पिंट्या) म्हात्रे,रुपेश नागवेकर, जेष्ठ पत्रकार संजय कदम आदी मान्यवर उपस्थित होते. दुपारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी खांदा कॉलनी सेक्टर मधील श्री दत्त मंदिरात जाऊन दर्शन घेतले. येथे दिवसभर धार्मिक कार्यक्रम, कीर्तन आयोजन करण्यात आले होते.

या ठिकाणी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, नवीन पनवेल शहराध्यक्ष दशरथ म्हात्रे, प्रीतम उर्फ पिंट्या म्हात्रे, रुपेश नागवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. दत्त जयंतीनिमित्त पनवेल तालुक्यात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



**पनवेल : शिवाजीनगर येथील श्री स.स. बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने बुधवारी हभप महेशमहाराज शाळुंके (पाटणोली, पनवेल) यांचे कीर्तन झाले. या वेळी माजी पं.स.सदस्य रत्नप्रभा घरत, अरुण घरत, अरुण ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप नेते संजय टेंबे यांचा वाढदिवसानिमित्त राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, नवीन पनवेल अध्यक्ष मयुर कदम आदी उपस्थित होते.**

# दत्त जयंतीनिमित्त उरणमध्ये यात्रा

## आमदार महेश बालदी यांच्याकडून भाविकांना महाप्रसाद



**उरण : वार्ताहर**

श्री दत्त जयंती निमित्ताने उरण तालुक्याची यात्रा गुरुवारी (दि. ४) मोठ्या उत्साहात भरली होती. उरण शहरातील उरण देवुळवाडी येथे भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. उरण शहरात खेळणी, शोभेच्या वस्तू, खाण्याचे स्टॉल लावण्यात आले होते. श्री दत्त मंदिरात सुनील बैरागी यांनी अभिषेक व आरती केली. दुपारी १२.३० वाजता आरती करण्यात आली.

देवूळवाडी येथील दत्त मंदिर येथे आमदार महेश बालदी मित्र मंडळाच्या वतीने भाविकांना व यात्रेकरूंसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

या वेळी माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, शोभा कोळी, संपूर्णा थळी, जान्हवी पंडित, रजनी कोळी, रवी कुलकर्णी, सुनील पेडणेकर, नवीन राजपाल, नितीन पाटील, रोहित पाटील, राजेंद्र पडते, हितेश शाह, मनन पटेल, दिनेश ठक्कर, अजित भिंडे, मनोहर सहातिया, सुरज ठवले, हस्तीमल मेहता, विनायक कोळी, सचिन वैद्य, संतोष ओटवकर, दीपक दली यांच्यासह सर्व महेश बालदी मित्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

यात्रेमध्ये एन.आय. हायस्कूल मैदान येथे आकाश पाळणे, मिनी ट्रेन, खाद्य पदार्थ स्टॉल, मिठाई, लहान मुलांचे खेळ, शोभेच्या वस्तूची दुकाने ठेवण्यात आली होती.

# शिक्षक-पालक संघाची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (दि.४) उच्च माध्यमिक विभागाची शिक्षक-पालक संघाची दुसरी सहविचार सभा प्राचार्य बी.बी साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहाच्या वातावरणात पार पडली.

विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रास्ताविकात प्रा. के. एच.सरोदे यांनी शिक्षक-पालक संघाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत पालक-शिक्षक संवादाची गरज अधोरेखित केली.

यानंतर उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांनी विद्यालयाची वैशिष्ट्ये, शैक्षणिक-सांस्कृतिक उपक्रम आणि पालकांचे महत्त्वपूर्ण सहकार्य याबाबत सविस्तर माहिती दिली. पालक प्रतिनिधी जितेंद्र साळुंखे यांनी विद्यालयाला पालकांच्या वतीने सहकार्य करण्याचे आश्वस्त केले. या वेळी सत्र परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. मितेश मेतकर यांनी केले.

या वेळी रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. झुंजार माने, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी, प्रा. विठ्ठल पाटील, तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पनवेलच्या सिद्धी देशमुखचे 'टॅलेंट'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील सिद्धी विश्वास देशमुख हिने तिच्या कलेच्या बळावर राष्ट्रीय स्तरावरील सर्वात प्रतिष्ठित रिॲलिटी शो इंडियाज गॉट टॅलेंट सीझन इलेव्हन यामध्ये परफॉर्म करणार आहे. द्रोण आर्चरी अकादमीच्या तिच्या सहकाऱ्यांसह सिद्धीने दिलेला थरारक आणि अद्वितीय परफॉर्मन्स आता संपूर्ण देश पाहणार असून, याचा प्रत्येक पनवेलकराला अभिमान वाटत आहे.

द्रोण आर्चरी अकादमीची टीम देशातील वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये उत्तुंग कामगिरी करत आली असून, त्यांच्या अभिनव शैलीतील आर्चरी परफॉर्मन्स आर्ट ने देशभरातील प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या टीममध्ये सिद्धीचे योगदान विशेष उल्लेखनीय असून, तिच्या नेमबाजीतील अचूकता, आत्मविश्वास व मंचावरील उपस्थिती खरोखर प्रेरणादायी आहे.

इंडियाज गॉट टॅलेंटच्या परीक्षकांनीदेखील त्यांच्या परफॉर्मन्सची दाद देत त्यांचे कौतुक केले आहे. पनवेलच्या मातीतून उगवलेल्या या लहानग्या कलाकाराने राष्ट्रीय पातळीवर मिळवलेली ही संधी केवळ तिच्यासाठीच नाही, तर पनवेल शहरासाठीही मोठा सन्मान आहे. सिद्धीच्या यशामागे तिच्या पालकांचे, प्रशिक्षकांचे आणि संपूर्ण अकादमीचे कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण मार्गदर्शन आहे.

या शनिवार आणि रविवारी रात्री ९.३० वाजता, सोनी टीव्ही आणि सोनी लिव अँप वर सिद्धी आणि तिच्या टीमचा परफॉर्मन्स प्रसारित केला जाणार आहे. शहरातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि क्रीडाप्रेमी यांनी सिद्धीला भरभरून शुभेच्छा दिल्या असून, सर्वांनी हा अप्रतिम प्रदर्शनाचा क्षण नक्की पाहावा, असे पालकांनकडून आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# सुरक्षिततेलाच प्राधान्य हवे

हजारो तऱ्हांनी सर्वसामान्यांची मोबाइलमार्फत डिजिटल फसवणूक केली जात असताना मोबाइलच्या संदर्भात नागरिकांच्या सुरक्षिततेलाच प्राधान्य द्यायला हवे. विरोधकांच्या हे का ध्यानात येत नाही कुणास ठाऊक? दरम्यान, 'संचार साथी' या केंद्र सरकारच्या मोबाइल ॲपला लोकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून त्याच्या अनिवार्यतेची फारशी गरज नाही. त्यामुळे मोबाइल फोन उत्पादकांना केलेली 'संचार साथी' ॲपच्या समावेशाची सक्ती केंद्र सरकारने मागे घेतली आहे.

**सायबर गुन्ह्यांमध्ये अफाट वेगाने होत चाललेली वाढ लक्षात घेऊन त्यांना अटकाव करण्यासाठी केंद्र सरकारकडून अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. देशभरातील सायबर पोलिसठाण्यांसारख्या यंत्रणाही हे गुन्हे रोखण्यात अपुऱ्या ठरत आहेत. त्यासाठी तंत्रज्ञानाच्या दृष्टीने प्रभावी आणि सर्वसामान्यांच्या वापराच्या दृष्टीने सोपी, सुटसुटीत यंत्रणाच आवश्यक आहे. याच हेतूने सरकारने जानेवारी २०२५मध्ये 'संचार साथी' हे मोबाइल ॲप लाँच केले. तेव्हापासून म्हणजे गेले जवळपास दहाअकरा महिने हे ॲप अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. त्याही आधी २०२३ मध्ये हे प एका पोर्टलच्या स्वरुपात सुरू करण्यात आले होते. आतापर्यंत १.४ कोटी लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले असून दररोज फसवणुकीच्या जवळपास दोन हजार प्रकरणांची माहिती देण्यात ते मदत करते. 'संचार साथी'च्या वापरकर्त्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. परंतु तंत्रज्ञानाबद्दल फारसे जागरूक नसलेल्या लोकांना हे ॲप वापरणे सोपे व्हावे या हेतूने ॲप अनिवार्य करण्याचे निर्देश सरकारने मोबाइल उत्पादकांना दिले. मार्च २०२६ पासून विक्रीस येणाऱ्या सर्व नवीन स्मार्टफोन्समध्ये 'संचार साथी' हे प आधीच म्हणजे प्री-इन्स्टॉल करण्याचे निर्देश केंद्रसरकारच्या दूरसंचार विभागाने १ डिसेंबर रोजी स्मार्टफोन उत्पादकांना दिले. नागरिकांना बनावट हँडसेट खरेदी करण्यापासून वाचवण्यासाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि टेलिकॉम सुविधांचा दुरुपयोग ओळखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचेही सरकारने आपल्या निर्देशात म्हटले होते. परंतु नव्या मोबाइल फोनमध्ये हे ॲप प्री-लोड करण्यात येणार व ते कुणालाही काढून टाकता येणार नाही हे समजताच विरोधी पक्षांनी त्याविरोधात ओरड सुरू केली. हा तर नागरिकांवर पाळत ठेवण्याचा प्रयत्न आहे असा आरोप विरोधक करू लागले. त्यांनी संसदेतही हा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. वापरकर्त्यांची गोपनीयता आणि निवडीच्या स्वातंत्र्याचा हा भंग आहे असा आक्षेप काही मोबाइल कंपन्यांनी घेतला. वास्तविक या ॲपला लोकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून अनिवार्यतेची तशी फारशी गरजच नसल्याने केंद्र सरकारने मोबाइल फोन उत्पादकांना केलेली ॲपच्या समावेशाची सक्ती मागे घेतली आहे. इतर अनेक पप्रमाणेच हे ॲप मोबाइलमधील कॅमेरा, फोनकॉल, मेसेज आणि लोकेशन आदीचे क्सेस मागते. इतर कितीतरी ॲप्सना आपण तशी परवानगी देत असतो. त्यामुळे या सरकारी ॲपलाच विरोधकांचा विरोध कशासाठी असा प्रश्न पडतो. हजारो तऱ्हांनी सर्वसामान्यांची डिजिटल फसवणूक केली जात असताना मोबाइलच्या संदर्भात नागरिकांच्या सुरक्षिततेलाच प्राधान्य द्यायला हवे. विरोधकांच्या हे कधी लक्षात येईल कुणास ठाऊक? दरम्यान, 'संचार साथी' पद्वारे हेरगिरी करणे ना शक्य आहे, ना कधी शक्य होईल. प्रत्येक नागरिकाला हे प वापरायचे की नाही तसेच मोबाइल फोनमधून ते काढून टाकायचे की नाही हे ठरवण्याचा संपूर्ण अधिकार आहे हे सरकारने स्पष्ट केले आहे.**

# एटीव्ही बाईकवाल्यांची अरेरावी थांबवा

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर दोन दिवसांपूर्वी ऑल टरेन व्हेईकलचा (एटीव्ही ) अपघात झाला. एटीव्हीने एका महिलेला धडक दिली. त्यात ही महिला जखमी झाली. तीन वर्षांपूर्वी असाच एटीव्ही बाईकचा अपघात घडला. त्यात एक उंट जखमी झाला. चार पर्यटक जखमी झाले होते. याबात पर्यटकांनी पोलीसात तक्रार दाखल केली नाही. परंतु या अपघाताची चित्रफीत समाजमाध्यमांवर मोठ्या प्रसारीत झाली. प्रसिध्दी माध्यामांमध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या. त्याची दखल घेऊन पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात पोलीसांनी बाईकचा मालक आणि बाईक चालक याच्याविरांधोत गुन्हा दाखल केला.

यानंतर या एटीव्हीवर बंदी घालण्यात आली होती. काही दिवस अलिबाग समुद्रकिनार्याव एटीव्ही चालवण्यास बंदी घालण्यात आली. नंतर त्यांना मार्ग बदलून देण्यात आला. काही दिवस हे चालले. परंतु पुन्हा येरे माझ्या मागल्या. बाईक पुन्हा सुरू झाल्या. बाईकमुळे स्थानिकांना रोजगार मिळतो हे खर आहे. परंतु बाईकचा अपघात होऊन पर्यटक जखमी होणार असतील तर त्यांना आवरावेच लागेले. या बाईक चालकांना चाप लावला पाहिजे. एटीव्ही बाईक मालकांची अरेरावी थांबवली पाहिजे.

अलिबाग सामुद्रकिनाऱ्यावर एटीव्हीचा अपघात होण्याची ही पहिली वेळ नाही. यापुर्वीही चालकांचे नियंत्रण सुटल्याने एटीव्ही अपघाताच्या घटना अलिबाग येथे घडल्या आहेत. अपघात घडला की प्रकरण मिटवले जाते. कुणी पोलीसात तक्रार करत नाही . त्यामुळे या बाईक वाल्यांवर कारवाई होत नाही. एकदा पत्रकाराने चित्रीकरण केले, छायाचित्र काढले म्हणून त्याच्यावर हात उचलण्यापर्यन्त बाईकवाल्याचीं मजल गेली होती. कारवाई होत नसल्यामुळे त्यांची अरेरावी वाढली आहे. आता पुन्हा अपघात झाल्यामुळे अलिबाग समुद्र किनार्यावर बेकायदेशीरपणे चालविण्यात येणाऱ्या एटीव्हीं वाहनांचा प्रश्न चर्चेत आला आहे.

एटीव्ही गाड्या खेळण्यांच्या प्रकारात मोडतात, त्यामुळे या गाड्यांना प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे रजिस्ट्रेशन लागत नाही. गाड्यांची तपासणी केली जात नाही. कुठल्याही विभागाची व्यवसायासाठी परवानगी घेण्याची गरज पडत नाही. व्यवसायासाठी नियम आणि अटी अस्तित्वात नाही, त्यामुळे एटीव्ही वाल्यांवर कोणताही अनिर्बंध नाही.

या वाहनांची नियमित तपासणी केली जात नाही. धोकादायक अवस्थेत या गाड्या व्यवसायासाठी आणल्या जातात. त्यामुळे अपघात होतात. १० ते १४ वयोगटातील अल्पवयीन मुले देखील या या गाड्या चालवतात. वेगमर्यादेचे उल्लघन केले जाते. बहुतांश अपघात एटीव्ही बाईक अल्पवयीन चालकांमुळेच होतात. गाड्यांचा आवाज मोठ्याने यावा यासाठी सायलेन्सर मध्ये बदल करून घेतले जातात. यामुळे कानठळ्या बसतील येवढे आवाज या गाड्या करतांना दिसतात. गाड्या कुठल्या क्षेत्रात चालव्यात याचे निर्बंध अस्तित्वात नाहीत. त्यामुळे पर्यटकांच्या मधून कुठेही या गाड्या चालविल्या जातात. चालकांचे नियंत्रण सुटले तर त्या सरळ पर्यटकांना जाऊन धडकतात.

बाईक वाल्यांवर कारवाई कुणी करावी यावर काही स्पष्ट नियम नाहित. शासकीय खात्यांमध्ये एक वाक्यता नाही. त्यामुळे कारवाई कुणी करावी यावर घोड अडत शासकीय खात्यांमध्ये सामन्वय नाही. कार व वॉटर स्पोर्ट्स किंवा एटीव्ही बाईक चालवण्याची परवानगी देण्याची जबाबदारी पर्यटन विकास महामंडळाकडे सोपवण्यात आली आहे. त्यामुळे या परवानगीशी आमचा संबंध नाही. आमच्याकडे केवळ बोटींची नोंदणी व सर्व्हेक्षणची जबाबदारी आहे, असे मेरी टाईम बोर्डाचे अधिकारी सांगतात. या गाड्या समुद्रकिनार्यावर चालवतात ही हद्द नगरपरिषदेची नसते त्यामुळे नगरपरिषद कारवाई करत नाही. त्याचा गैरफायादा बाईकवाले घेतात.

पर्यटनाला चालना मिळावी. त्याव्दारे स्थानिकांना राजगार मिळावा म्हणून वॉटर स्पोर्टस सुरू करण्यास परवानगी दिली जाते. जेव्हा असे परवाने दिले जातात तेव्हा पर्यटकांच्या सुरक्षीतेचा देखील विचार केला गेला पाहिजे. एटीव्ही बाईक अल्पवयीन मुलेच चालवत असतात. त्यामुळे अपघात होता.

काही वर्षांपूर्वी असाच एक अपघात अलिबाग समुद्रकिनार्यावर घडला होता. त्याचे चित्रण करणार्या पत्रकारावर या बाईक वाल्यांनी हल्ला केला होतो. त्यामुळे काही दिवस अलिबाग समुद्रकिनार्यावर एटीव्ही बाईक चालविण्यास बंदी घालण्यात आली होती. त्यांनतर पोलीसांनी काही नियम घालुन दिले. या बाईक गर्दीच्या ठिकाणी न चालवता कोळीवाड्याच्या दिशेने चालवाव्यात असे सांगण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वी घडलेल्या अपघात प्रकरणी पोलीसांत गुन्हा दाखल झालेला नाही. गुन्हा दाखल झालेला नसला तरी पोलीसांनी याबाबत कडक भूमिका घ्यायला हवी. कडक निर्बंध घालून एटीव्ही बाईक मालकांची अरेरावी थांबवली पाहिजे .

एटीव्ही बाईक चालविण्यात पूर्णपणे बंदी घालावी अशी कुणाची मागणी नाही. अल्पवयीन मुलांना या बाईक चालविण्यात आणि गर्दीच्या ठिकाणी एटीव्ही बाईक चालविण्यास बंदी घातली पाहिजे. या संबंधित शासनाच्या सर्व विभागांनी एकत्र बसून काही नियम तयार करावेत ते संपूर्ण जिल्ह्यात लागू करावेत. अन्यथा असे अपघात होतच राहणार.

## निर्माल्य...

देवीचरणी वाहण्यासाठी फुलं अणलीयेत खूप सारी. गुलाबाच्या पाकळीवरील मखमलीचा वर्ख त्याचा रंगाला अधिकच शोभून दिसतोय, तर सफेद, पिवळी, गुलाबी शेवंती भाव खाऊन जाते. तिकडे केशरी-पिवळा गोंडा मनात घर करून बसलाय. नक्की कोणत्या फुलांचा हार बनवू काळत नाहीये. तेव्हड्यात आजी म्हणाली, अगं! किती त्या फुलांना गोंजारत आहेस, उद्या त्यांचं निर्माल्यच होणार आहे. देवाला वाहून शिळी झालेली फुले म्हणजे निर्माल्यच. तिच्या या वाक्यासरशी मी भानावर आले. मनात म्हटलं, खरंच की, उद्या या फुलाची काय किंमत असणार आहे..?

फुलांना माहिती नसेल काय उदय ती कोमेजणार आहेत. तरीही आज ती सुईमधून धाग्यात ओवली जाणार आहेत वेदना बाजूला सारून. किती टवटवीत, प्रफुल्लित वाटत आहेत ही फुलं. असं किती आयुष्य असेल या फुलांचं? एक दिवस, दोन दिवस जास्तीत जास्त तीन दिवस, पण उद्या निर्माल्य होणार म्हणून ती उदास नाहीत किंवा दुःखी नाहीत. आयुष्यात मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन ही फुलं आज प्रत्येकाला मोहित करत आहेत, बघणाऱ्यांच्या नेत्रांना आनंद देत आहेत. त्यांच्या गंधानं प्रसन्न करीत आहेत.

मग वाटायला लागलं प्रत्येकाचं आयुष्य हे असंच असतं. कधीतरी त्याचं निर्माल्य होणार आहे. फरक इतकाच प्रत्येकाची विलीन होण्याची पद्धत वेगळी आहे, पण एक ना एक दिवस प्रत्येकाला निर्माल्य व्हायचंच आहे.

'वपु' म्हणतात, आयुष्याचं निर्माल्य होण्याआधी त्याचा आस्वाद घेता आला पाहिजे. किती सोप्या शब्दांत त्यांनी आयुष्याची व्याख्या मांडली आहे.

आयुष्याचा आस्वाद घेणं म्हणजे काय? मला वाटतं की एकदाच मिळालेलं आयुष्य भरभरून जगायचं, हेवे-दावे, रुसवे -फुगवे यांना आपल्या आयुष्यात डोकावण्याची संधी न देता मत्सराची झालर बाजूला सारून मनमुक्तपणे जगावं. आपल्याप्रमाणे इतरांचं अस्तित्वसुद्धा तितकच महत्त्वाचं आहे हे मान्य करून निर्मळमनाने जगण्याचा स्वीकार करावा आणि जेव्हा तुम्ही इतरांचं अस्तित्व मोठ्या मनानं स्वीकारता तेव्ह तुम्हाला खऱ्या अर्थानं जगणं कळलेलं असतं. ओरबाडून घेण्यापेक्षा देण्यात ज्याला आनंद वाटतो तो माणूस म्हणून जगतो.

आयुष्यात अनेक अडचणी येतात म्हणून कुणी जगणं सोडत नाही तसेच एक दिवस निर्माल्यच व्हायचं आहे म्हणून फुलणं का थाबवायचं. यासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षणाला घट्ट मिठी मारून भेटलं पाहिजे. आयुष्य असं जगावं की निर्माल्य झाल्यावरसुद्धा ते गंधाळलं पाहिजे. निर्माल्य म्हणजे विझल्यानंतसुद्धा प्रत्येकाच्या आठवणीत अमर होणं हो ना....

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**



## बदलते तंत्रज्ञान

# मारुतीची पहिली इलेक्ट्रिक कार ई-व्हिटारा लॉन्च

मारुती सुझुकी आपली पहिली इलेक्ट्रिक कार ई-व्हिटारा २ डिसेंबरला लॉन्च केली. यात ४९kWh आणि ६१kWh चे दोन बॅटरी पॅक पर्याय मिळतील. कंपनीचा दावा आहे की, कार एकदा पूर्ण चार्ज केल्यावर ५०० किलोमीटरपेक्षा जास्त धावेल. इलेक्ट्रिक SUV चे उत्पादन फेब्रुवारी-२०२५ पासून सुझुकी मोटर गुजरात प्रायव्हेट लिमिटेडच्या प्लांटमध्ये सुरू झाले आहे.



ही पूर्णपणे मेड-इन-इंडिया इलेक्ट्रिक कार आहे आणि युरोप आणि जपानसारख्या १०० हून अधिक देशांमध्ये तिची निर्यात केली जाईल.मारुति ई व्हिटाराच्या बेस मॉडेलची किंमत २० लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवली जाऊ शकते. तर, हाय पॉवर मोटरसह ६१kWh बॅटरी पॅक असलेल्या मॉडेलची किंमत २५ लाख रुपये (एक्स-शोरूम) असू शकते.

**एक्सटीरियर :एलइडी हेडलॅम्प आणि १९-इंच ब्लॅक व्हील**

सुझुकी ई व्हिटारा नवीन हार्टेक्ट-ई प्लॅटफॉर्मवर विकसित करण्यात आली आहे, जो कंपनीने टोयोटासोबत मिळून तयार केला आहे. सुझुकी ई विटाराची बाह्य रचना एतद संकल्पना मॉडेलसारखीच आहे. याच्या पुढील भागात पातळ :एलइडी हेडलाइट्स आणि ध-आकाराचे :एलइडी DRLs आणि स्टायलिश बंपरसोबत एकत्रित फॉग लाइट्स देण्यात आले आहेत.

बॉडी क्लेडिंग आणि १९-इंच ब्लॅक व्हील्समुळे ही मध्यम आकाराची SUV बाजूने खूपच मस्क्युलर दिसते. मागील दरवाजावरील डोअर हँडल सी-पिलरवर देण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, छतावर एक इलेक्ट्रिक सनरूफ देखील आहे. ई व्हिटाराच्या मागील बाजूस संकल्पना आवृत्तीप्रमाणे ३-पीस लाइटिंग एलिमेंटसह कनेक्टेड :एलइडी टेल लाइट्स देण्यात आल्या आहेत.

इंटिरियर : ६ एअरबॅग स्टँडर्ड आणि इलेक्ट्रॉनिक पार्किंग ब्रेक मिळतील ई-व्हिटारामध्ये ड्युअल-टोन ब्लॅक आणि ऑरेंज केबिन दिली आहे. यात २-स्पोक फ्लॅट बॉटम स्टिअरिंग व्हील आणि व्हर्टिकल ओरिएंटेड एसी व्हेंट्सच्या सभोवती क्रोम टच दिला आहे. या केबिनचे प्रमुख वैशिष्ट्य इंटिग्रेटेड फ्लोटिंग स्क्रीन सेटअप दिले आहे, ज्यात एक इन्फोटेनमेंट आणि दुसरी ड्रायव्हर डिस्प्ले आहे.

# नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला

## निमित्त



नेल्सन रोलिहलाहला मंडेला हे दक्षिण आफ्रिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून वर्णभेदविरोधी नेते होते. १९९४ ते १९९९पर्यंत ते देशातील पहिले कृष्णवर्णीय राष्ट्रप्रमुख होते आणि पूर्णपणे प्रातिनिधिक लोकशाही निवडणुकीत निवडून आलेले पहिले होते. त्यांच्या सरकारने वांशिक सलोखा वाढवून वर्णभेदाचा वारसा नष्ट करण्यावर लक्ष केंद्रित केले. वैचारिकदृष्ट्या आफ्रिकन राष्ट्रवादी आणि समाजवादी. त्यांनी १९९१ ते १९९७पर्यंत आफ्रिकन नॅशनल काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून काम केले. दरवर्षी १८ जुलै रोजी जगभरात नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस साजरा केला जातो. आज या लेखात आपण नेल्सन मंडेला यांचे जीवनचरित्र पाहणार आहोत...

दक्षिण आफ्रिकेतील शतकानुशतके जुन्या वर्णभेदाला विरोध करणारे महान जननेते नेल्सन मंडेला यांचा जन्म १८ जुलै १९१८ रोजी दक्षिण आफ्रिकेतील इस्टर्न केप, मेवेझो येथे झाला. त्याचे वडील गेडला हेन्री म्फकेनिस्वा हे म्वेजो शहराचे आदिवासी सरदार होते.


हेन्रीची तिसरी पत्नी नेकुफी नोस्केनी हिच्या पोटी मंडेला यांचा जन्म झाला. नेल्सन मंडेला हेन्रीच्या १३व्या मुलांपैकी तिसरे होते. सरदारांच्या मुलाला स्थानिक भाषेत मंडेला म्हणत. ज्यावरून त्याला त्याचे आडनाव मिळाले. मंडेला यांचे वडील त्यांना 'रोलिहला' या नावाने हाक मारायचे. त्याची आई मेथोडिस्ट होती. मंडेला यांनी त्यांचे प्रारंभिक शिक्षण क्लार्कबेरी मिशनरी स्कूलमधून पूर्ण केले.

देशातील परिस्थिती पाहून नेल्सन मंडेला १९४१मध्ये जोहान्सबर्गला गेले. जेथे ते वॉल्टर सिसुलू आणि वॉल्टर अल्बर्टाइन यांना भेटले, ज्यांच्या प्रभावाने त्यांनी देशातील रंगाच्या आधारावर भेदभाव दूर करण्यासाठी राजकारणात प्रवेश केला. दक्षिण आफ्रिकेतील स्वातंत्र्याच्या लढ्याशी एकजुटीची आंतरराष्ट्रीय चळवळ ही जगाने पाहिलेली सर्वात मोठी सामाजिक चळवळ होती. जगभरातील अक्षरशः प्रत्येक देशाचा विविध स्वरूपात वर्णभेद विरोधी क्रियाकलापांचा इतिहास आहे.

बऱ्याच देशांमध्ये वर्णभेदविरोधी क्रियाकलाप अनेक प्रकारच्या दडपशाहीविरूद्ध स्थानिक संघर्षांशी (औपचारिक किंवा अनौपचारिकपणे) जोडलेले होते. बहुतेक वर्णभेदविरोधी चळवळींनी त्यांचे कार्य दक्षिण आफ्रिकेपुरते मर्यादित ठेवले नाही, परंतु दक्षिण आफ्रिकेतील मुक्ती चळवळीला अधिक व्यापकपणे समर्थन दिले. नेल्सन मंडेला त्यांच्या वर्णभेदविरोधी कार्यामुळे ते वारंवार अधिकाऱ्यांचे लक्ष्य बनले. १९५२च्या सुरुवातीस त्यांच्यावर अधूनमधून बंदी घालण्यात आली होती. म्हणजे त्यांना प्रवास, सहवास आणि भाषणात प्रतिबंधित करण्यात आले होते. त्यांना डिसेंबर १९५६मध्ये इतर शंभरहून अधिक लोकांसह देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती, ज्याची रचना रंगभेदविरोधी कार्यकर्त्यांना त्रास देण्यासाठी करण्यात आली होती. त्याच वर्षी त्याच्यावर खटला चालला आणि अखेरीस १९६१मध्ये त्याची निर्दोष सुटका झाली. ५ डिसेंबर २०१३ रोजी त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रात्रीच्या जेवणात अजिबात खाऊ नयेत 'हे' पदार्थ

सकाळचा नाश्ता एखाद्या राजाप्रमाणे, दुपारचे जेवण सामान्य माणसाप्रमाणे तर रात्रीचे जेवण एखाद्या भिकाऱ्याप्रमाणे असावे असे आपल्याकडे म्हटले जाते. आहाराचे काही नियम असतात आणि ते नियम पाळले तर आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. रात्रीच्या वेळी झोपताना काही गोष्टी आहारात आवर्जून टाळायला हव्यात असे सांगितले जाते.



रात्रीचा आहार हा हलका आणि सहज पचेल असा असावा. रात्री झोपताना जर जड पदार्थ खाल्ले तर ते पचत नाहीत आणि त्यामुळे पचनशक्तीवर ताण येण्याची शक्यता असते. रात्री झोपल्यावर आपल्यी शरीराची पुरेशी हालचाल होत नाही. अशावेळी आहारात सहज पचणारे पदार्थ घ्यायला हवेत. आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. रेखा राधामोनी सांगतात, रात्रीच्या वेळी आहारात कोणते पदार्थ टाळायला हवेत याविषयी...

गव्हापासून तयार केलेले पदार्थ :- रात्रीच्या वेळी गव्हापासून तयार केलेले पदार्थ खाणे शक्यतो टाळावे. गहू आणि गव्हापासून तयार केलेले पदार्थ हे पचनास थोडे जड असतात. त्यामुळे रात्रीच्या जेवणात शक्यतो असे पदार्थ खाणे टाळावे तसेच हे पदार्थ वेळीच पचले नाही तर आपल्याला अपचन, ॲसिडिटी किंवा पोटाचे आजार यासंबंधित अनेक आजार होऊ शकतात.

दही :- दह्यामध्ये प्रोटीन असल्याने ते आरोग्यासाठी आवश्यक असते, पण दही पचायला काही प्रमाणात जड असल्याने ते रात्रीच्या वेळी खाणे शक्यतो टाळायला हवे तसेच दही प्रकृतीने थंड असल्याने त्यामुळे सर्दी-कफ यांसारख्या समस्या होण्याची शक्यता असते.

मैदा :- रात्रीच्या जेवणांत शक्यतो मैदा आणि मैद्यापासून तयार केलेले पदार्थ खाणे टाळावे. मैदा आणि मैद्यापासून तयार झालेले पदार्थ हे गव्हापेक्षा पचायला अधिकच जड असतात. यासाठी गव्हासोबातच मैदादेखील खाणे टाळावे.

गोड पदार्थ :- काहीजणांना जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याची सवय असते. परंतु ही सवय आपल्या आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकते. साखर पचायला जड असल्याने ती शक्यतो सूर्यास्त होण्याच्या आत खायला हवीत असे सांगितलेले आहे. जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याच्या सवयीमुळे आपल्या पचनक्रियेत बिघाड होऊ शकतो. तसेच पचनक्रियेच्या कार्यात अडथळा येऊ शकतो. यासाठीच जेवणानंतर गोड पदार्थ खाणे टाळावे.

# राज्य सांस्कृतिक पुरस्कारांवर अलिबागची मोहर

## ◆ कस्तुरी देशपांडे, अनुराग गोडबोले युवा पुरस्काराने सन्मानित

**अलिबाग : प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कारांच्या यादीत अलिबागच्या दोन कलाकारांची नावे झळकली आहेत. काल रविंद्र नाट्य मंदिर, मुंबई येथे झालेल्या शासकीय समारंभात अलिबागच्या कस्तुरी देशपांडे- मांजरेकर आणि अनुराग गोडबोले यांना राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य खात्याचे मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




कलेच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलावंताना महाराष्ट्र शासनातर्फे राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षी जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांच्या यादीत कस्तुरी देशपांडे- मांजरेकर हिला कलादान युवा पुरस्कार तर अनुराग गोडबोले याला युवा संगीत संयोजक पुरस्कार जाहीर करण्यात आले. एक लक्ष रुपये, मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे.

कस्तुरी देशपांडे आणि अनुराग गोडबोले यांचे शालेय शिक्षण येथील आरसीएफ शाळेत झाले असून अलिबागमध्ये शास्त्रीय गायिका शीतल कुंटे यांच्याकडे दोघांनी गायनाचे प्राथमिक धडे घेतले आहे. कस्तुरीने पुढे निषाद बाक्रे, गौरी पाठारे व पं अरुण कशाळकर यांच्याकडे तालीम घेतली आहे. तिला भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे राष्ट्रीय शिष्यवृत्तीही मिळाली आहे. भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शिष्यवृत्ती, देवल क्लब कोल्हापूरचा जयपूर गायकी विशेष पुरस्कार व गानवर्धन, पुणे संस्थेचा पं. त्र्यंबकराव जानोरीकर पुरस्कार, आयआयटी मुंबईच्या मूड इंडिगो २०१५चे विजेतेपद यांच्यासह अन्य पुरस्कारांनीही कस्तुरीला सन्मानित करण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठाच्या मास्टर ऑफ आर्ट्स या परीक्षेत विद्यापीठातून प्रथम येण्याचा बहुमान कस्तुरीने पटकाविला असून, पदवी परीक्षेतही तत्वज्ञान विषयात प्रथम क्रमाकांवर आपले नाव कोरले होते. त्यावेळी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या उपस्थितीत सुवर्णपदक देऊन तिचा गौरव करण्यात आला होता. सध्या भारतीय शास्त्रीय संगीतावर ती पीएचडी करत आहे.

मुंबई विद्यापीठाचा अभियांत्रिकी पदवीधर असलेला अनुराग गोडबोले याने मराठी सिने-नाट्य विश्वात आश्वासक संगीतकार म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. पं संजीव चिंबळगी यांच्याकडून शास्त्रीय गायकीची तालीम घेतलेल्या अनुरागाने मुंबई विद्यापीठात स्व. अनिल मोहिलेंसारख्या दिग्गज संगीतकारांच्या मार्गदर्शनाखाली संगीत दिग्दर्शनाचे धडे गिरविले आहेत. मराठीतील अनेक नाटके, चित्रपट, टीव्ही सीरिअल्ससाठी संगीत संयोजनाचे काम त्याने केले आहे. बॉईज फोर, पांडू सारख्या ब्लॉकबस्टर मराठी चित्रपटांसाठी त्याने केलेले पार्श्वसंगीत जाणकारांच्या पसंतीस उतरले होते. याव्यतिरिक्त अवधूत गुप्ते, वैशाली सामंत यांसह नामवंत संगीतकारांसाठी संगीत संयोजनाचे कामही तो करत आहे.

अलिबागच्या मातीत संगीताचे धडे गिरविलेल्या या दोन कलाकारांनी पटकाविलेल्या राज्य सांस्कृतिक पुरस्काराबद्दल इथल्या कलाक्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले असून सर्वत्र त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## सोन्याच्या दागिन्यांचा डबा चोरणाऱ्या दोन महिलांना अटक

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहरात स्नेहल रमेश गोंधळी या दोन महिन्यांपूर्वी नागोठणे बस स्थानकावर असताना त्यांच्या पर्स मधील सोन्याचे दागिन्याचा डबा अज्ञात चोरांनी चोरून नेला होता. या चोरीबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखा रायगड यांनी दोन महिला आरोपी यांना अटक करून त्यांच्याकडून एक तोळा सोन्याची रिकवरी प्राप्त केली होती.

या गुन्ह्यात नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज पाटील व त्यांचे टीमने आरोपी रेखा संतोष टंकाई ( वय ५५ वर्ष ) व साक्षी अरुण बंतू ( वय ३० वर्ष) यांच्यकडे अधिक तपास केला असता त्यांनी गुन्ह्यातील चोरी केलेले दागिने नांदेड येथील एका ज्वेलर्समध्ये विक्री केल्याचे सांगितल्याने नांदेड येथे जाऊन तपास केला असता, त्या आरोपी महिलांनी दागिने नक्षत्र ज्वेलर्स चे मालक सोमेश वसंतराव राजूरकर यांचेकडे मुलाचे उपचाराकरिता पैशांची गरज असल्याने विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले

नक्षत्र ज्वेलर्सचे मालक सोमेश राजूरकर यांचा सविस्तर जबाब नोंद करून ५.५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ९८/२/ब | ०-२९-१०<br>पैकी ०-१३-५५<br>पो. ख. ०-०१-००<br>एकूण ०-१४-५५ | ५.४४<br><br><br>२.७२ | शंकर गणपत पाटील<br>कानी बळीराम पवार<br>विठाबाई चंदर पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०४/१२/२०२५

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. ता. पनवेल जि. रायगड, मो.क्र. : ९९३०३६९८६१


# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भव्य श्रमदानाने विकासाची नवी ओळख!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील गाणी व कोंढे तर्फे श्रीवर्धन या गावांमध्ये 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत राबविण्यात आलेल्या व्यापक श्रमदान उपक्रमाने ग्रामीण विकासाला नवे बळ मिळाले. लोकसहभाग, स्वच्छता, दळणवळण सुधारणा आणि जलसंधारण या चार महत्वाच्या घटकांना केंद्रस्थानी ठेवून ग्रामस्थांनी एकाच दिवसात अनेक मूलभूत कामे पूर्ण करून दाखवली.




ग्रामपंचायत गाणीच्या पुढाकाराने आणि एक आठवड्यातील एक दिवस श्रमदानासाठी या संकल्पनेखाली ग्रामस्थ, महिलावर्ग, युवक, ग्रामपंचायत पदाधिकारी अशा सर्वांनी उत्साहाने कामात सहभाग नोंदवला. या मोहिमेत खालील प्रमुख कामे यशस्वीपणे पूर्ण झाली

कोंढे तर्फे श्रीवर्धन ते गाणी मार्गावरील कच्चा रस्ता समतल करून वाहतुकी योग्य करण्यात आला. ग्रामस्थांनी स्वतःच्या श्रमातून माती भराव, मार्ग स्वच्छता आणि दुरुस्तीची कामे हाती घेतली. शेतकरी, विद्यार्थ्यांपासून ते रोजंदारी मजुरांपर्यंत सर्वांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर झाला. परिसरातील झाडाझुडपी काढून स्वच्छता मोहीम. ग्रामस्थांना मूलभूत सुविधांचा सन्मानजनक वापर. गाणी गावच्या बंधाऱ्यातील गाळ काढण्याचे मोठे काम ग्रामस्थांच्या श्रमाने पूर्ण. पाणीसाठा क्षमता वाढून पाणीटंचाई हंगामात दिलासा मिळणार.

या श्रमदान कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, माजी पदाधिकाऱ्यांसह गावातील नेते, मंडळांचे अध्यक्ष आणि शेकडो ग्रामस्थांची उत्स्फूर्त उपस्थिती मिळाली. या वेळी प्रमुख मान्यवर सरपंच : आदित्य कासरुंग, उपसरपंच सुभाष उजळ, ग्रामपंचायत अधिकारी अभिजीत माने, सदस्य निखिल कदम, तनिषा आंबरस्कर माजी सरपंच अनंत शिगवण, कोंढे तर्फे ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष रामचंद्र शिगवण गाणी ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष रमेश धाडवे तसेच सुदाम शेडगे, नथुराम कासरुंग, संतोष खांडेकर, भिकू खांडेकर, रमेश घोलप यांच्यासह महिला वर्ग व युवकांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग होता या श्रमदान मोहिमेने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'चा उद्देश प्रत्यक्षात उतरवला.

# माणगाव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन लोणेरे येथे उत्साहात

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

शिक्षण विभाग पंचायत समिती माणगाव, पन्हळघर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ लोणेरे , माणगाव तालुका विज्ञान व गणित अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जे. बी. सावंत हायस्कूल पन्हळघर लोणेरे येथे दि.१डिसेंबर आणि २ डिसेंबर रोजी उत्साहात पार पडले.



विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यास माणगाव तालुका गटविकास अधिकारी श्रीमती शुभदा पाटील, पन्हळघर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ कार्याध्यक्ष नानासाहेब सावंत ,जे. बी. सावंत विद्यालयाचे अध्यक्ष भाऊसाहेब सावंत,माणगाव तालुका माणगाव तालुका गटशिक्षणाधिकारी श्रीमती सुरेखा तांबट, लोणेरे ग्रामपंचायत सरपंच प्रकाश टेंबे, जे.बी. सावंत गोरेगाव बिटाचे विस्ताराधिकारी कुमार खामकर, विद्यालयाचे प्राचार्य बि.आर. कांबळे,गणित विज्ञान मंडळचे अध्यक्ष व सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

विकसित आणि आत्मनिर्भर भारत विषयावर आधारित हे विज्ञान प्रदर्शन बालवैज्ञानिकांमध्ये शोधक वृत्ती, सृजनशीलता, कल्पनाशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, तांत्रिक कौशल्य, सादरीकरण या गुणांना उत्तेजन देणारे आणि आत्मविश्वासाने स्पर्धात्मक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना तयार करणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे असे प्रतिपादन तळाच्या गटशिक्षण अधिकारी श्रीमती सुरेखा तांबट यांनी प्रास्ताविकात केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री तुकाराम मोतीराम बताले यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १४३/२/१ | १ | १-००-०० | ०-००-०० | १-००-००<br>पैकी विक्रीदार यांच्या मालकीचे क्षेत्र<br>०-३३-०० पैकी<br>०-१६-०० | ७.६२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/१२/२०२५

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. मोबाईल : ८८८८२७१७५९



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-मोर्बे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे: मोर्बे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोर्बे | १. विष्णु बाळु नावडेकर<br>२. चंद्रा गोविंद नावडेकर<br>३. आकाश गोविंद नावडेकर<br>४. मोनीका अमर म्हात्रे<br>५. दिक्षीता प्रतीक पाटील<br>६. प्रगती नंदकुमार हातमोडे<br>सर्व रा. मोर्बे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड | ९५/२/ई | ०.४३.९०<br>०.०३.३०<br>०.४७.२०<br>पैकी<br>०.२०.०० | ११.८७ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: ०४/१२/२०२५**

सही/-
**ॲड. विजयेंद्र बा. शितोळे**
**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को.ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६, मो. क्र. ८६५७९ ७७९४१**


# मुरुड विज्ञान प्रदर्शनात शाळांचा उत्स्फूर्त सहभाग

**मुरुड : प्रतिनिधी**

पंचायत समिती शिक्षण विभाग, अ.ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसई व गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २२ वे तालुका विज्ञान प्रदर्शन अ.ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसई येथे गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली शानदार उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात ३६ प्रतिकृतींचे सादरीकरण करण्यात आले आहे. विविध माध्यमिक व प्राथमिक शाळांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.



गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, चेअरमन खेळू वाजे,संस्थेचे विश्वस्त वसंत लोखंडे, महादेव गोळे, सचिव संजय रेडीज, विस्तार अधिकारी मुबीन वासकर, गौतम मनवर, संतोष पटाईत, मुख्याध्यापक अरूण खुळपे, गणित विज्ञान मंडळ चे विनायक महाडीक, प्रशांत शिंदे,ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी आदी सह विविध शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, बालवैज्ञानिक, विद्यार्थी, शिक्षक, साधन व्यक्ती आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रथम गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी प्रास्ताविक करताना या विज्ञान प्रदर्शनातून वैज्ञानिक तयार होत असतात. विद्यार्थीयांची विचार करण्याची वैचारीक पातळी वाढते. लहानपणी न्यूटन यांना फळ झाडावरून खाली का पडला. हा प्रश्न पडला म्हणून गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला अशी जिद्द विद्यार्थ्यांमध्ये असते असे यावेळी त्यांनी आपले मत मांडले. संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे यांनी विज्ञान प्रदर्शन महत्व सांगितले.

## कार-दुचाकीच्या अपघातात एक जखमी

**पेण :** तालुक्यातील तरणखोप येथे दुचाकीला कारने धडक दिल्याने एकजण जखमी झाला आहे. पेण पोलीस ठाणे हद्दीत १ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता हा अपघात झाला.गिरोबा हॉटेल तरणखोपचे बाजुस असलेल्या पेण शहरात जाणारे सर्व्हिस रोडवर येथे फिर्यादी यांचा मुलगा त्याचे ताब्यातील दुचाकी घेवुन येत असताना सर्व्हिस रोडवर मोटरसायकलला कारने ठोकर दिली. याबाबत पेण पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला


### महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ४० (ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

टिप :- या निविदेमध्ये एकूण ११ कामे समाविष्ठ असुन ऑफलाईन निविदा विक्री व बीडप्रिपरेशन दिनांक ०५.१२.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक १२.१२.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ०४/१२/२०२५**
**आरओसी-२०२५-२६/क्र-५/सी४३६५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**शहर अभियंता विभाग**

**दरपत्रक**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड मधील नवीन पनवेल सेक्टर-१३अ येथील HDFC बँक व अग्निशमन केंद्र नवीन पनवेल लगत चौकाचे सुशोभिकरण करणे. | ०५/१२/२०२५ ते १२/१२/२०२५ (०७ दिवस) |
| २. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड मधील नवीन पनवेल सेक्टर-८ खांदा कॉलनी येथील आदई गाव फाटा, हॉटेल फिनिक्स समोर डेकोरेटीव्ह म्युरल बसविणे. | |
| ३. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह परिसरात डेकोरेटीव्ह म्युरल बसविणे. | |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ०५/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com व panvelcorporation@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.६५९/६८२/२०२५**
**दिनांक :- ०४/१२/२०२५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-मोर्बे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे: मोर्बे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोर्बे | १. तेजस प्रविणचंद्र शाह<br>२. राकेश खुशालचंद्र पोद्दार<br>दोघेही रा. मोर्बे, ता-पनवेल, जिल्हा-रायगड | १०२/३ | १.५५.००<br>०.२०.००<br>१.७५.०० | ३.१९ |

सदरहू जागा,जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: ०४/१२/२०२५**

सही/-
**ॲड. विजयेंद्र बा. शितोळे**
**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को.ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६, मो. क्र. ८६५७९ ७७९४१**

# वायू प्रदूषण रोखण्यासाठी सहकार्य करा

## नवी मुंबई मनपाचे आवाहन; शहरात स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत ठोस उपाययोजना करण्यास सुरुवात झाली असून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सर्वच विभाग क्षेत्रात सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविल्या जात आहे.



यामध्ये दैनंदिन स्वच्छतेप्रमाणेच मुख्य रस्त्यांवरील माती साफ करून रस्ते प्रक्रियाकृत पाण्याने धुवून घेण्यात येत आहेत. याशिवाय हवेत एनकॅपच्या वाहनाने प्रक्रियाकृत पाणी फवारून हवेतील धुलीकण कमी करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे बांधकाम साईट्स, कॉरी व सिमेंट निर्मितीचे आरएमसी प्लान्ट यांचेमार्फत वायू प्रदूषण होणार नाही याकडेही विभागीय स्तरावर स्थापन केलेल्या विशेष पथकांकडून काटेकोर लक्ष दिले जात आहे. नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंडात्मक रक्कम वसूल केली जात आहे तसेच त्याठिकाणी आढळणाऱ्या त्रुटींमध्ये सुधारणा न केल्यास साईट तात्पुरती बंद करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

नमुंमपा क्षेत्रातील हवा गुणवत्ता चांगली रहावी याकरिता महानगरपालिकेमार्फत ‘काय करावे’ व ‘काय करू नये’ याविषयी जाहीर आवाहन प्रसिध्द करण्यात आले असून त्यानुसार नागरिक व संस्थांनी नियमांचे पालन करून संपूर्ण सहकार्य करावे आणि महानगरपालिकेच्या वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये आपले योगदान द्यावे असे आवाहन केले आहे.

दैनंदिन निर्माण होणारे कचऱ्याचे वर्गीकरण करावे व पुनर्वापरावर भर द्यावा. ऊर्जा बचतीसाठी एलइडी दिवे, ऊर्जा बचत उपकरणे व सौरऊर्जेचा वापर वाढवावा. एलपीजी, सीएनजी व विद्युत चलित वाहनांच्या वापरासाठी जास्तीत जास्त नागरिकांना प्रोत्साहित करावे.

लहान अंतरांसाठी सायकल किंवा पायी प्रवासांना प्राधान्य द्यावे. शक्य असेल तेव्हा बस, मेट्रो, सामुहिक वाहन अशा सार्वजनिक वाहतूकीच्या पर्यायांचा उपयोग करावा. वाहनांची नियमित सर्व्हिसिंग करुन इंजीन योग्य रितीने चालण्याची खात्री करावी व त्याव्दारे कमी प्रमाणात धूर निर्माण होईल याची काळजी घ्यावी. प्रत्येकाने आपल्या परिसरात किमान एक झाड लावावे आणि त्याचे संर्वधन करावे.

कोणत्याही परिस्थितीत झाडांवरील पानांचा हरित कचरा तसेच प्लास्टिक किंवा इतर कचरा जाळू नये. यामुळे निर्माण होणारा धूर आरोग्याला आपायकारक आहे.

बांधकामांच्या ठिकाणी धूळ प्रदूषण टाळण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने जाहीर केलेल्या ध्वनी व वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक तसेच ब्लास्टिंग करीता अवलंबिण्याच्या मानक कार्यप्रणालीचे काटेकोर पालन करावे. मोकळ्या किंवा उघडया जागी बांधकाम साहित्य किंवा राडारोडा टाकणे पूर्णपणे टाळावे. उद्योग समुहांनीही प्रदूषण नियंत्रण नियमांचे काटेकोर पालन करावे.

फटाक्यांचा अनावश्यक वापर टाळावा. कोळशामुळे धूर होऊन वायू प्रदुषण होते हे लक्षात घेत बेकरी, हॉटेल व वापर होतो अशा ठिकाणी वापर पूर्णपणे बंद करावा आणि पर्यायी पर्यावरण पूरक साहित्याचा वापर करावा.

# आविष्कार स्पर्धेत पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठ आयोजित रायगड विभागीय आंतरमहाविद्यालयीन आविष्कार संशोधन स्पर्धा रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सरस्वती कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, खारघर येथे झाली. या स्पर्धेत पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विविध विभागातील तब्बल ८० विद्यार्थ्यांनी एकूण ३९ संशोधन प्रकल्प सादर केले.




सादर केलेल्या संशोधन प्रकल्पापैकी ०६ संशोधन प्रकल्पांची रायगड विभागामधून मुंबई विद्यापीठाच्या अंतिम आविष्कार संशोधन फेरीसाठी निवड झाली. विजेत्या विद्यार्थ्यामध्ये रूपाली पोपटा, काजल गायकवाड, मयूर पाटील (रसायनशास्त्र विभाग), तन्वी झनकर, देवयानी खेडेकर (अर्थशास्त्र विभाग), सिद्धार्थ साळुंखे, प्रियल पाटील, ओम पाटील, वैष्णवी पटेकर, तन्वी मोकल (आय.टी. विभाग), प्रार्थी म्हात्रे, दीपिका पाटील (मराठी विभाग) यांचा समावेश आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, डॉ. प्रमोद ठाकूर, डॉ. यशवंत उलवेकर, प्रा. प्रवीण गायकर व प्रा. पूजा ठाकूर या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, महाविद्यालयाच्या संशोधन क्षेत्रातील ही अविस्मरणीय कामगिरी आहे. या सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा झेंडा मुंबई विद्यापीठात अभिमानाने फडकवला, याचा मला विशेष आनंद वाटतो. हे यश संपादन करून महाविद्यालाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केल्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छाही दिल्या.

विद्यार्थ्यांच्या व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांच्या या उज्वल कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य प्रो. डॉ. लक्ष्मण गवळी, आविष्कार कमिटीचे चेअरमन डॉ. प्रमोद ठाकूर व कमिटीतील सर्व सदस्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# कळंबोलीत व्यसनमुक्तीचा नारा

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीमधील केएलई महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून व्यसनमुक्ती, सायबर सुरक्षा अन सामाजिक हिताचे प्रबोधन करण्याचा नारा वसाहतीमधील गुरुविला हाऊसिंग सोसायटीमध्ये देण्यात आला. या वेळी पथनाट्यातून अमली पदार्थांचे सेवन टाळा अति मोबाईलचा वापर करू नका आणि सायबर सुरक्षा विषयी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी प्रबोधन केले. या वेळी वसाहती मधील रहिवाशी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




कळंबोलीतील केएलई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या समवेत कळंबोलीतील रहिवासी संकुलामध्ये पथनाट्याच्या माध्यमातून अमली पदार्थांचे होणारे दुष्परिणाम अति मोबाईलचा वापर केल्याने होणारे समाज विघातक परिणाम मोबाईलचा वापर करताना सायबर सुरक्षा विषयी घ्यावयाची काळजी याबाबत प्रबोधन करणारे भीतीचित्र बॅनर पथनाट्याच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांनी मराठी हिंदी इंग्रजी या तिन्ही भाषांतून रहिवासी संकुलातील नागरिकांचे, विद्यार्थ्यांचे प्रबोधन करून सुरक्षा घेण्याचे आवाहन केले. केएलई महाविद्यालयातील प्राध्यापिका स्वप्नाली कादगे व अन्य सहकारी प्राध्यापक वर्गाने यामध्ये सहभाग नोंदवला.

महाविद्यालयातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने यामध्ये उपस्थित होते. तसेच गुरुव्हील्ला हाऊसिंग सोसायटीचे पदाधिकारी गहीनाथ धुमाळ, केसरीनाथ मोकल, माजी सैनिक पवन पवार व अन्य सदस्य महिला विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर, नवी मुंबई येथील राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई येथे बुधवारी (दि.३) जागतिक दिव्यांग दिन अत्यंत उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. हा उपक्रम दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी, त्यांच्या हक्कांविषयी जनजागृतीसाठी आणि समावेशक समाजनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरला.




हा कार्यक्रम संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. त्यांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे आणि नियोजनामुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून राज्य शासनाच्या दिव्यांगजन कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे उपस्थित होते. याशिवाय कार्यक्रमास अतिथी म्हणून हेलेन केलर इन्स्टिट्यूट ऑफ डेफ अँड डेफ ब्लाइंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश देसाई, अलिबाग जिल्हा दिव्यांगजन सक्षमीकरण अधिकारी मंगेश पाटील, शिरीष पूजारे उपस्थित होते तसेच विशेष अतिथी म्हणून डॉ. अविनाश पडालकर अमरेन्द्र शाह, अनुराधा बागची, जगन मुदगडे आदी उपस्थित होते.

या वेळी सचिव तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग व्यक्तींकरिता शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपयुक्त योजना, अधिकार, सुविधा आणि नविन उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमामध्ये बौद्धिक दिव्यांग मुले, त्यांचे पालक तसेच प्रशिक्षणार्थींनी नृत्य, गायन, नाटक इत्यादी विविध कलाप्रकारांची मनमोहक सादरीकरणे केली. हेलेन केलर इन्स्टिट्यूटच्या विशेष विद्यार्थ्यांनीही नृत्य, सांकेतिक भाषेत जन गण मनचे सादरीकरण करून सर्वांची मनं जिंकली.

मुख्य अतिथी तुकाराम मुंढे यांच्या हस्ते राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजान सशक्तीकरण संस्था नवी मुंबई आणि द हंस फॉउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यान्वित असलेल्या प्रकल्पाअंतर्गत तिसऱ्या बसचे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय बौद्धिक सशक्तीकरण संस्थेद्वारा विकसित निपिड दिशा पुस्तके आणि एसएलडी किटचे वाटप बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यांना करण्यात आले. संस्था प्रमुख डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी संस्थेमध्ये राबविण्यात येणाऱ्या सेवांची माहिती दिली आणि २०२५ च्या दिव्यांग दिनाच्या थीमनुसार समावेशकतेचे महत्त्व अधोरेखित केले. या संपूर्ण कार्यक्रमामध्ये दिव्यांग मुले, त्यांचे पालक, प्रशिक्षणार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

# बीसीटी लॉ कॉलेजमध्ये ॲडव्होकेट डे साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, न्यू पनवेल येथे गुरुवारी (दि.४) ॲडव्होकेट डे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. हा उपक्रम आदरणीय प्राचार्या सौ. सानवी देशमुख मॅडम यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायाचे महत्त्व, व्यावसायिक मूल्ये आणि सामाजिक उत्तरदायित्व समजावून देणे हा होता.




कार्यक्रमाची सुरुवात मिस. आर्या कदम (FY LLB) यांच्या उत्कृष्ट सूत्रसंचालनाने झाली. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला प्रतिष्ठित मान्यवर ॲडव्होकेट मनोज भुजबळ सर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ॲड. मनोज भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वकिलीमधील व्यावसायिक शिस्त, न्यायासाठी असलेली वकीलांची जबाबदारी, कायद्याचा सखोल अभ्यास, कोर्टातील प्रत्यक्ष अनुभव आणि योग्य ड्राफ्टिंग कौशल्य यांच्या गरजेवर भर दिला.

कार्यक्रमास ॲड. राहुल घरत (JBSP संस्था सदस्य व उऊऊ सदस्य) यांनी देखील उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी वकिली क्षेत्रात आत्मविश्वास आणि संवाद कौशल्याचे स्थान विशद केले.कार्यक्रमाला BA.LLB समन्वयक धनश्री कदम मॅडम यांनीही उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमादरम्यान ॲड. नेहा काची यांनी ॲडव्होकेट डेचा ऐतिहासिक आणि व्यावहारिक महत्त्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांनी वकिलांची सामाजिक बांधिलकी, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि न्यायव्यवस्थेशी संबंधित जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. तसेच विद्यार्थ्यांनी मूट कोर्ट, इंटर्नशिप, संशोधन आणि कायदेवाचनामध्ये सक्रिय सहभाग ठेवावा असे मार्गदर्शन केले.

FY LLB आणि B-. LLB विद्यार्थ्यांनी भाषणे आणि विचारमांडणी सादर करून कार्यक्रम अधिक आकर्षक केला. कार्यक्रमाची सांगता मिस. लावण्या (LLB विद्यार्थीनी) यांनी आभार प्रदर्शन करून झाली.

# गव्हाण विद्यालयात मुलींसाठी व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये हंकल अध्यासिव्ह टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्यूमन वॅल्यूस यांच्या संयुक्त उपक्रमातून १ ते ३ डिसेंबर असे तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करून मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला व मुलींना सॅनिटरी कीटचे वितरण करण्यात आले.




किशोरवयीन मुलींसाठी हा खास कार्यक्रम या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला.या वेळी सारिका शेलार, वैष्णवी नवले आणि सृष्टी गंभीरराव या तीन महिला समुपदेशिकांनी तीन दिवस प्रश्नावली द्वारे व्याख्यानमाला घेतली.

प्रश्नांद्वारे मुलींनी देखील आपल्या शंका विचारून त्याचे निरसन करून घेतले.या तीन दिवसाच्या उपक्रमात शेलार मॅडम, गंभीरराव मॅडम आणि नवले मॅडम यांनी मुलींना व्यवस्थित मार्गदर्शन केले. या किशोरवयीन मुलीने देखील स्वानुभव सांगून हसत खेळत या उपक्रमात सहभाग नोंदवला. १३३ विद्यार्थिनींनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

शेवटच्या दिवशी बुधवारी (दि.३) या संस्थेतर्फे विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅड, दोन डेटॉल लिक्विड बॉटल आणि माहितीपत्रक अशा पद्धतीचे किट १३३ मुलींना वाटप करण्यात आले. या कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी हंकल कंपनीतर्फे कंपनी टीम विद्यालयास भेट देण्यात आली होती.

या वेळी IAHV च्या महाराष्ट्राच्या प्रमुख धडाडीच्या कार्यकर्त्या सुप्रिया पाटील यांनी शेवटच्या दिवशी उत्तम असे व्याख्यान आयोजित करून टीमलाही आमंत्रित केले होते. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी या सर्व टीमचे मनःपूर्वक आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षला पाटील यांनी केले.

# पनवेल परिसरात दत्त जयंती उत्साहात

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांनी विविध ठिकाणी घेतले दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात श्री दत्त जयंती मोठ्या उत्साहात आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून गुरुवारी (दि.४) साजरी झाली. या निमित्ताने संपूर्ण परिसरात भाविकांमध्ये भक्तीमय वातावरण पहायला मिळाले. या मंगलमय सोहळ्यादरम्यान, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी आरीवली, शिवकर, मोहोचापाडा, दुंदरे, मोरबे, वावंजे, खिडूकपाडा यांसारख्या विविध ठिकाणी आयोजित केलेल्या जयंतीच्या कार्यक्रमांना भेट देऊन श्री दत्त गुरूंचेमनोभावे दर्शन घेतले.

यानिमित्त ठिकठिकाणी श्री दत्त गुरूंच्या मूर्तींची आणि पादुकांची विधिवत पूजा करण्यात आली. अनेक ठिकाणी भजन-कीर्तन, धार्मिक प्रवचने, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून दत्तनामाचा जयघोष केला.

या वेळी भाजपचे नेते संजय पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनिष ढवळे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, महेंद्र गोजे, राम गोजे, अक्षय पाटील, महेंद्र भोईर, गुरुनाथ भोईर, प्रवीण पाटील, बाळाराम उसाटकर, रमेश नावडेकर, प्रकाश खैरे, प्रभूदास भोईर, सुरेश भोईर, शंकुनाथ भोईर, युवामोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, नवीन पनवेल अध्यक्ष मयुर कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते.












# रायगडात मतदान यंत्रांसाठी 'स्ट्राँग' सुरक्षा

## श्रीवर्धनमध्ये २४ तास पोलिसांची नजर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीनंतर ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूमचे सर्व सुरक्षा व्यवस्थापन काटेकोरपणे आणि कायद्याच्या चौकटीत पार पाडले जात आहे. प्रशासकीय भवन, तहसील कार्यालय, श्रीवर्धन येथे तयार केलेल्या स्ट्राँग रूममध्ये २४ तास पोलिसांचा जबरदस्त बंदोबस्त तैनात असून, संपूर्ण परिसर निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कडक सुरक्षा कवचाखाली आहे.



मतदान प्रक्रिया संपल्यानंतर सर्व मतदान यंत्रे (ईव्हीएम) प्रशासकीय भवन, तहसील कार्यालय, श्रीवर्धन येथे स्थापन केलेल्या अधिकृत स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. स्ट्राँग रूम परिसरात प्रवेश फक्त अधिकृत परवानगी आणि नोंदवहीमध्ये नोंद करूनच दिला जात आहे.

संपूर्ण परिसरात तीन स्तरांमध्ये सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. स्ट्राँग रूमवर थेट २४ तास बंदोबस्त, पोलीस अधिकारी दोन, कर्मचारी पाच, तहसील कार्यालय संपूर्ण परिसरासाठी रॅपिड ॲक्शन फोर्स १० अंमलदार सर्व फोर्स २४x७ ड्युटीवर असून, सुरक्षा वर्तुळात कोणतीही शिथिलता होऊ नये यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण सतत सुरू आहे. मतदान यंत्रे असलेल्या ठिकाणी आगप्रतिबंधक उपाययोजना पूर्णतः लागू करण्यात आल्या आहेत. नगर परिषद श्रीवर्धनकडील अग्निशमन यंत्रणा पूर्ण सज्ज फायर कर्मचारी संख्या पाच, परिसरात अग्निशमन सिलिंडर्स, प्रेशर पंप, संरक्षक उपकरणे उपलब्ध, तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी कर्मचारी २४ तास तत्पर स्ट्राँग रूम व बाहेरील संपूर्ण परिसराचे इलेक्ट्रॉनिक निरीक्षण सुरू आहे. CCTV कॅमेरे – १३, सर्व कॅमेरे २४ तास रेकॉर्डिंग मोडमध्ये, फीड थेट नियंत्रण कक्षात उपलब्ध. प्रत्येक हालचाल नोंदवली जात असून कोणतीही शंका आढळल्यास तत्काळ चौकशी प्रत्येक पक्षाला स्ट्राँग रूमवर स्वतंत्र व पारदर्शक प्रवेश सुनिश्चित केला आहे.

संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी नोंदवही प्रणालीद्वारे प्रवेश व्यवस्था स्ट्राँग रूमचे दरवाजे सील करण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंगसह पंचनामा. प्रवेशद्वारांवर २४ तास दोन स्तरांची मॅन्युअल तपासणी. वीजपुरवठा खंडित झाल्यास जनरेटरद्वारे तत्काळ बॅकअप. परिसरात प्रतिबंधित क्षेत्र घोषित– अनधिकृत प्रवेशास मनाई श्रीवर्धन तहसील कार्यालयात उभारलेल्या स्ट्राँग रूमभोवती निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अत्यंत कडक, पारदर्शक आणि अभेद्य सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे.

मतदान यंत्रणा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन, पोलीस विभाग, SRPF, अग्निशमन दल आणि आयटी विभाग एकत्रित समन्वयाने २४ तास सज्ज आहेत.

## रोह्यात खबरदारी; चोख बंदोबस्त

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी मतदान संपल्यानंतर त्याचा निकाल २१ डिसेंबर रोजी लागणार आहे. मतदान झाल्यानंतर मतदान यंत्रपेटी ( ईव्हीएम मशीन ) २१ डिसेंबर पर्यंत सुरक्षित रहावे यासाठी निवडणूक विभागाने खबरदारी घेतली आहे. चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या ज्येष्ठ नागरिक सभागृहाच्या वरती स्ट्राँग रूम तयार करण्यात आले आहे या ठिकाणी यंत्रपेटी (ईव्हीएम मशीन) ठेवण्यात आली आहे. या ठिकाणी १३ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. निवडणूक विभागाकडून १२ तपासणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.सुरक्षेचा उपाय म्हणून अग्निशमन चे अधिकारी व एक अग्निशमन बंब ठेवण्यात आले आहे.

पोलीस उपविभागीय अधिकारी प्रसाद गोकुळे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.पोलीस यंत्रणाकडून बंदोबस्त म्हणून एस.आर. पी. एफ च्या १० जवानांची तुकडी तैनात करण्यात आली आहे. यासह दोन उपनिरीक्षक व आठ पोलीस तैनात करण्यात आले आहे.

राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अर्ज केल्यास त्यांना स्ट्राँग रूम येथे लक्ष ठेवण्यासाठी परवानगी देण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार किशोर देशमुख यांनी दिली आहे.




# नुकसानग्रस्त व्यक्तीला मंत्री गोगावलेंकडून मदत



**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागात हरवंडी गावच्या परशुराम मानकर यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे आग लागली.ज्यामुळे दुर्दैवाने घराचे एकूण ८५ टक्के नुकसान झाले. ही घटना कळताच मंत्री भरत गोगावले यांनी तात्काळ हरवंडी येथे धाव घेतली आणि मानकर कुटुंबाला धीर दिला.

मानकर यांचे वस्त्र, धान्य, फर्निचर आणि इतर जीवनावश्यक साहित्य यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यावेळी गोगावले यांनी सर्वतोपरी मदतीचा हात देण्याचे सांगितले. सदर कुटुंबाला तात्काळ ५० हजाराची रोख मदत देण्यात आली. एका भग्न झालेल्या कुटुंबात नवसंजीवनी फुंकण्याचा प्रयत्न आहे.

शिवसेना सदैव जनतेच्या सुख-दुःखात सहभागी राहिली आहे, आणि आजही तोच संकल्प कायम आहे. संकटाच्या प्रत्येक क्षणी सामान्य माणसाच्या सोबत राहण्याचा. मानकर आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब लवकरच पुन्हा नव्या उत्साहाने उभं राहील, हीच अपेक्षा असे गोगावले यांनी सांगितले.

या वेळी उपतालुकाप्रमुख मनोज सावंत, युवा सेनेचे अविनाश नलावडे, अच्युत तोंडलेकर, संजय शिंदे, गजानन मोहिते, प्रसाद जाधव इत्यादी उपस्थित होते.



**रोहा : तालुक्यात सकाळी पडलेल्या धुक्याचे मनमोहक छायाचित्र टिपले आहे महादेव सरसंबे यांनी.**

# वडगाव शाळेत राज्य समन्वयकांची भेट

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगांव शाळेला राज्य समन्वयकांनी सदिच्छा भेट देऊन शाळेच्या प्रगतीची पाहणी केली. शाळेच्या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थी यांना केले मार्गदर्शन केले.

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव ता.खालापूर जि.रायगड येथे सर फाउंडेशन महाराष्ट्राचे राज्य समन्वयक बाळासाहेब वाघ व सिद्धाराम माशाळे यांनी सदिच्छा भेट दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिशा नवोपक्रमाची या पुस्तकाचे लेखक सिद्धाराम माशाळे यांनी शाळेत सर्वांचे योगदान व भूमिका कशी महत्त्वाची आहे, हे विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांना समजावून सांगितले तसेच सर फाउंडेशन महाराष्ट्र अंतर्गत चालणारे विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. तसेच बाळासाहेब वाघ यांनी विद्यार्थ्यांना यश, स्पर्धा व मेहनत याविषयी मार्गदर्शन करताना शाळेने अल्पकालावधीत मिळविलेल्या शैक्षणिक यशाबद्दल कौतुक करत विद्यार्थी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन केले.



सूत्रसंचालन वैजनाथ जाधव यांनी केले. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा राजश्री जांभुळकर, शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड, सहशिक्षक वैजनाथ जाधव, स्वयंसेवक संकेत काठोळे, संचिता गडगे व पालक उपस्थित होते.

सर फाउंडेशन सारख्या माध्यमातून शैक्षणिक उठावासाठी अनेक उपक्रम राबवले जातात त्यांचे महाराष्ट्रातील नेतृत्त्वाने शाळेला भेट दिली ही विद्यार्थ्यांसाठी एक ज्ञानाची पर्वणीच होती सरांचे मनःपूर्वक आभार, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.

# गो.म. वेदक कॉलेजमध्ये विज्ञान प्रदर्शनास प्रतिसाद

**तळा : प्रतिनिधी**

विज्ञान म्हणजे कुतूहल, प्रयोगशीलता आणि नवसर्जनाचा संगम आणि हाच संगम अनुभवायला मिळाला. या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांची वैज्ञानिक जिज्ञासा, तांत्रिक कौशल्य आणि नवोन्मेषी वृत्तीचा अप्रतिम आविष्कार घडवून आणला होता. विज्ञान प्रदर्शनाच्या प्रतिकृती दालनाचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के, महादेव बैकर यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मंगेश देशमुख होते.



व्यासपीठावर मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, पर्यवेक्षक महादेव लोकरे, विज्ञान प्रमुख विनायक महाडकर, प्रा.टी.एन. भुरे, जयश्री मचे, प्रा.बी.डी. शिंदे, प्रा.एस. टी. जमादार, प्रा.के.जे. वाडीकर, प्रा. एन. सी. पाटील, प्रा. बी.एस. कुळकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. परीक्षक म्हणून रूपा सप्रे आणि काकासाहेब पवार यांनी काम पाहिले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमुख प्रतिकृतींपैकी वॉटर डिस्पेन्सर, मच्छर नाशक अगरबत्ती, ठिबक सिंचन प्रणाली, पक्कड यंत्र, कृत्रिम दंतमंजन, त्रिमितीय प्रतिमा, प्रदूषित वायू निरसन, पिण्याचे पाणी शुद्धीकरण मॉडेल, सौरमाला, ज्वालामुखीचा उद्रेक, पाण्याचे चक्र, रक्ताभिसरण तंत्र, हरितगृह परिणाम, प्रदूषण नियंत्रण, स्मार्ट सिंचन, पवनचक्की, जलविद्युत निर्मिती, सौरऊर्जेचे घर, चुंबकत्व प्रयोग, विद्युत परिपथ, प्रदूषणमुक्त शहर, हवामान बदल मॉडेल, स्मार्ट ट्रॅफिक सिस्टीम, ध्वनीतरंग, अवकाश प्रक्षेपण केंद्र, जलशुद्धीकरण संयंत्र, कृत्रिम पाऊस, पृथ्वीचे अंतर्गत स्तर, वायू प्रदूषण उपाय योजना, स्मार्ट शेती, आपत्कालीन ऊर्जा निर्मिती अशा अनेक उत्कृष्ट संकल्पनांचा समावेश होता. विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने प्रतिकृती, निबंध, वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता सहावी ते आठवीच्या गटात प्रतिकृती हर्षवर्धन पवार प्रथम, निबंध प्रथमेश्वरी ठमके प्रथम, वक्तृत्व हर्षल आंबेगावे प्रथम, प्रश्नमंजुषा सई वावेकर व ग्रुप प्रथम, इयत्ता नववी ते बारावीच्या गटात प्रतिकृती ललित चौधरी व ग्रुप प्रथम, निबंध ठसाळ संस्कृती प्रथम, वक्तृत्व आर्या गायकवाड प्रथम, प्रश्नमंजुषा समीक्षा सावंत व ग्रुप प्रथम क्रमांक पटकावला.

सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सुत्रसंचलन सुहास भालेकर यांनी केले आहे. या वेळी संस्थेचे पदाधिकारी, पालक, गो.म.वेदक विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# परळीतील आदिवासी भवन विद्यार्थ्यांसाठी प्रगतीचे दालन ठरेल –भाजप नेते प्रकाश देसाई

**पाली : प्रतिनिधी**

आदिवासी भवन आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदान, संस्कार तसेच भविष्यात समाजाच्या प्रगतीचे दालन ठरेल, असे प्रतिपादन भाजप नेते प्रकाश देसाई यांनी केले.



रायगडच्या सुधागड तालुक्यातील परळी पडवली येथे आदिवासी भवनाचे लोकार्पण सुधागड तालुक्यातील परळी पडवली रोड येथे प्रधानमंत्री जनमन योजनेतून सुमारे ६० लाख रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या आदिवासी कातकरी समाज बहुउद्देशीय केंद्र आदिवासी भवनचे नुकतेच शानदार उदघाटन करण्यात आले. आदिवासी बांधवांसाठी बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय केंद्राचे उद्घाटन तसेच लोकार्पण सोहळा प्रकाश देसाई यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली जल्लोषात करण्यात आला. या वेळी देसाई यांनी सांगितले की असे बहुउद्देशीय आदिवासी केंद्र तालुक्यात परळी सह ढोकशेत धरणाची वाडी सिद्धेश्वर विकासवाडी दहिगाव येथे सुरू होत आहे.

या सोहळयासाठी परळी ग्रामपंचायतच्या सरपंच साक्षी देसाई, भाजपचे जिल्हा चिटणीस विठ्ठल सिनकर माजी सभापती उज्वला देसाई, माजी सरपंच श्रद्धा कानडे माजी सभापती पिठू डुमना, भाजपाचे सुधागड तालुका उपाध्यक्ष आतिष खंडागळे, परळी ग्रामपंचायतचे उपसरपंच धर्मेंद्र आंदेकर, आदिवासी समाज परळी अध्यक्ष ॲड. रमेश पवार, बिरसा मुंडा आदिवासी संस्था अध्यक्ष अनंत वाघमारे, महिला अध्यक्ष खालापूर हिरा पवार आदी उपस्थित होते.

# अंजुमन कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचा समारोप

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजीरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड-जंजिराच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचा समारोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हे संपूर्ण शिबिर प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या राबविण्यात आले. महाविद्यालयातील ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या समारोप कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना रायगड जिल्हा समन्वयक डॉ. टी. पी. मोकल, संस्थेचे सचिव हिफझुर्रहमान नझीरी, महाविद्यालयाचे चेअरमन झैनुद्दीन कादिरी, सदस्य तौसिफ फत्ते यांचा विशेष समावेश होता. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजभान, शिस्त आणि स्वयंसेवकत्वाची भावना रुजवणारे ठरल्याचे डॉ. टी. पी. मोकल यांनी नमूद केले. संस्थेचे सचिव



हिफझुर्रहमान नझीरी यांनी शिबिरार्थींना या गावासोबत आपले संबंध अधिकाधिक घट्ट करण्यासाठी नेहमी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन व प्रत्यक्ष भेटींचे आयोजन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक झैनब खानझादा, अब्दुल रहमान भारून आणि समीर जमकर यांनी शिबिरातील त्यांच्या अनुभवांचे मनोगत व्यक्त केले. शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, समिती सदस्य प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. स्वालिहा करबरी आणि प्रा. आयेशा फहीम यांनी विशेष परिश्रम घेतले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनूफ हाफिज यांनी प्रभावीपणे पार पाडले.

# शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**पाली : प्रतिनिधी**

शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांच्या ११६व्या जयंतीनिमित्त पालीवाला महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिर उत्साहात आणि सामाजिक भावनेने पार पडले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या पुढाकाराने तसेच शासकीय रक्तपेढी, अलिबाग यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला सुएसो अध्यक्ष गीताताई पालरेचा, सचिव ग. रा. म्हात्रे, संचालिका शिल्पाताई लिमये, संचालक तृप्ती मराठे, प्राचार्य भाऊसाहेब घोडके , एनएसएस कार्यक्रम अधिकारी एस. ए. पाटील, शासकीय रक्तपेढी अलिबागचे वैद्यकीय अधिकारी दीपक गोसावी, एचडीएफसी बँक खोपोली शाखेचे प्रमुख हेमंत खेडेकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमात एकूण ६६ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समाजाप्रती आपली बांधिलकी सिद्ध केली. विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग तसेच स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या सर्व दात्यांना एचडीएफसी बँकतर्फे भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. तसेच महाविद्यालयाच्या वतीने रक्तदान प्रमाणपत्र देऊन प्रत्येक दात्याचा विशेष गौरव करण्यात आला.




# सुधागड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात हर्ष जाधव आणि सारंग ठाकूर प्रथम

**पाली : प्रतिनिधी**

शिक्षण विभाग पंचायत समिती सुधागड, विज्ञान-गणित अध्यापक मंडळ तसेच सु.ए.सो. चे ग. बा. वडेर हायस्कूल आणि वसंतराव गणेशमल ओसवाल ज्युनियर कॉलेज, पाली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात पार पडला.



विद्यार्थी प्रतिकृती मध्ये प्राथमिक गटात माध्यमिक विद्यालय वाघोशीचा हर्ष विजय जाधव तर माध्यमिक गटात ग. बा. वडेर हायस्कूल पालीचा सारंग बल्लाळ ठाकूर यांनी प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नाव नोंदविले. या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी तब्बल ५२ कल्पक प्रतिकृती सादर केल्या. पर्यावरण संवर्धन, डिजिटल नवोपक्रम, ऊर्जा निर्मिती, आरोग्य संरक्षण, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयोगशील सादरीकरणाला सर्वत्र कौतुक मिळाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून राज्यस्तरीय समन्वयक विश्वास कोरडे, सु.ए.सो.च्या संचालिका ज्योत्स्ना देसाई, हर्षा चांदोरकर, तृप्ती मराठे, पं.स.पाली चे विस्तार अधिकारी नवनाथ साबळे, विज्ञान अध्यापक मंडळ अध्यक्ष विक्रम काटकर, गणित अध्यापक मंडळ अध्यक्ष मंदार सिनकर, विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब घोडके, तसेच मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी

# मुंबईचा केरळकडून धक्कादायक पराभव

**मुंबई : प्रतिनिधी**

स्टार खेळाडूंची फौज मैदानात उतरवूनही मुंबईच्या संघाला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये केरळविरुद्ध १५ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. केरळच्या १८० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सर्फराज खानने एकीकडे अर्धशतक झळकावूनही संघाला विजय मिळवून देण्यात अपयश आले. विशेष म्हणजे, स्फोटक फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या संथ खेळीमुळे मुंबईच्या आशा संपुष्टात आल्या आणि त्यांना संपूर्ण २० षटकेही खेळता आली नाहीत.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या केरळच्या संघाने निर्धारित २० षटकांत ७ बाद १७८ धावा केल्या. केरळकडून कर्णधार संजू सॅमसनने (२८ चेंडूंत ४६ धावा, ८ चौकार, १ षटकार) आणि विष्णू विनोदने (४३ धावा) धमाकेदार सुरुवात केली. अखेरच्या षटकांमध्ये सैफुद्दीनने (१५ चेंडूंत ३५ धावा, ५ चौकार, २ षटकार) तुफान फटकेबाजी करत धावसंख्या १७८पर्यंत पोहचवली. मुंबईच्या एकाही गोलंदाजाला प्रभावी कामगिरी करता आली नाही.

१७९ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी मुंबईच्या संघाला तगडी सुरुवात आवश्यक होती, पण युवा आयुष महात्रे अवघ्या ३ धावांवर बाद झाला. यानंतर अनुभवी अजिंक्य रहाणेने १८ चेंडूंमध्ये ५ चौकारांसह ३२ धावांची तडफदार खेळी करत आशा निर्माण केल्या, पण तो विग्नेश पुथुरच्या जाळ्यात अडकला. यानंतर सर्फराज खानने एका बाजूने किल्ला लढवला. त्याने संयमी आणि गरजेनुसार वेगाने धावा करत संघाला लक्ष्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न केला, मात्र दुसऱ्या टोकाला सूर्यकुमार यादवकडून ज्या स्फोटक खेळाची अपेक्षा होती, ती पूर्ण झाली नाही. सूर्या २५ चेंडूंमध्ये ३२ धावा करून बाद झाला.

यानंतर मुंबईची फलंदाजी गडगडली. शिवम दुबे (११) आणि साईराज पाटील (१३) वगळता मधल्या आणि खालच्या फळीतील फलंदाज पूर्णपणे अपयशी ठरले. केरळच्या के.एम. आसिफने भेदक गोलंदाजी करत मुंबईच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. त्याने ३.४ षटकांत केवळ २४ धावा देत पाच महत्त्वपूर्ण बळी घेतले. त्याला विग्नेश पुथुर (२ बळी) आणि इतरांनी उत्तम साथ दिली. परिणामी मुंबईचा संपूर्ण संघ १९.४ षटकांत १६३ धावांवर गारद झाला आणि केरळने १५ धावांनी विजय मिळवला.

## सीकेटी कॉलेजमध्ये जेबीएसपी संस्था आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जेबीएसपी संस्था आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.




स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी (दि. ४) संस्थेचे संचालक संजय भगत आणि सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के.पाटील यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत ११०हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा.अनिल नात्ती, प्रा.भरत जितेकर, प्रा.प्रतिज्ञा पाटील व सदस्य परिश्रम घेत आहेत.

## गणेश तोटेची आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भिंगारी येथे राहणारा पॉवरलिफ्टर गणेश संजय तोटे याची टर्कीमध्ये ९ डिसेंबर रोजी होणाऱ्या आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. गणेश या स्पर्धेकरिता गुरुवारी रवाना झाला.



पुण्यातील सासवड येथील वाघिरे महाविद्यालयात एमए राज्यशास्त्र प्रथम वर्षातील विद्यार्थी गणेश तोटे नुकताच रोमानिया येथे झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सहभाग घेऊन घरी परतला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करीत इथपर्यंत पोहचलेल्या या खेळाडूच्या वडिलांचे आकस्मित निधन झाले. वडिलांना दिलेले वचन पाळण्यासाठी गणेशने अश्रू पुसून थेट क्रीडांगणात धाव घेतली आणि पुणे विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत 'सुवर्ण' कामगिरी केली.

दरम्यान, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गणेशला मध्यंतरी आर्थिक मदत करून पाठबळ दिले आहे. त्यांच्यासह रायगड पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव, खजिनदार राहुल गजरमल, ज्येष्ठ क्रीडापटू माधव पंडित, संदीप पाटकर, सुभाष टेंबे आदींनी गणेशला आशियाई स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## उलवेतील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय मराठी माध्यमचा वार्षिक क्रीडा महोत्सव गुरुवारी (दि. ४) उत्साहात झाला. त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

स्कूल कमिटीचे सदस्य निलेश खारकर व धीरज ओवळेकर तसेच सीबीएससी माध्यमाच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व क्रीडा ज्योतीचे प्रज्वजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे प्रमुख दीपक भरणुकेयांनी केले. इयत्ता दहावीची विद्यार्थिनी वैभवी सोमासे हिने सर्वांना क्रीडा शपथ दिली.

या वेळी मनोगत व्यक्त करताना धीरज ओवळेकर म्हणाले की, खेळातून संघ भावना जपली जाते. स्पर्धेत कुठल्याही प्रकारचा आकस मनामध्ये ठेवायचा नाही आणि उन्मत न होता खिलाडूवृत्ती दाखवणे हादेखील एक सद्गुण आहे. आपण सर्व विद्यार्थी खेळाचे महत्त्व राखण्यात यशस्वी व्हाल, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. पाहुण्यांच्या हस्ते कबड्डी खेळाच्या नाणेफेकीचा कौल करण्यात आला. सौ. पाटील यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. डी.जी. पाटील यांनी मैदान आखणी केली, तर बी.एम. म्हात्रे, वेदांगी म्हात्रे, सौ. घरत व शिपाई अशोक ठाकूर यांनीही मेहनत घेतली.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय शुटिंग बॉल स्पर्धेत विजेते

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शुटिंग बॉल स्पर्धेत विजेतेपद पटकाविले आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने १९ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

विजेत्या संघात मोहम्मद आसीफ कासकर, जयेश शामराव कदम, शोएब बिलाल सुर्वे, आदित्य अशोक राणे, प्रित विलास भोईर, सुजल संजय शिंदे, कार्तिक कैलास म्हात्रे, कार्तिक अजय जाधव, अय्यान अब्बास अंतुले, हार्दिक सचिन साळुंखे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी अभिनंदन व कौतुक केले.






## मिचेल स्टार्क कसोटीचा नवा 'वेगवान डावखुरा' बादशहा!

**ब्रिस्बेन :** अ‍ॅशेस मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने एक विक्रम आपल्या नावावर केला. इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या या सामन्यात तीन बळी मिळवताच त्याने पाकिस्तानचा माजी गोलंदाज वसीम अक्रमचा विक्रम मोडीत काढला. आता कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक बळी घेणारा डावखुरा वेगवान गोलंदाज म्हणून मिचेल स्टार्क सिंहासनावर विराजमान झाला आहे. अक्रमने कसोटी क्रिकेटमध्ये ४१४ बळी मिळवले होते आणि इतकी वर्षे हा विक्रम त्यांच्याच नावावर होता. स्टार्कने अक्रमला मागे टाकले. कसोटी क्रिकेटमधील १०२व्या सामन्यात त्याने हा टप्पा गाठला.

## अलिबाग मुरूड मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

आरसीएफ ग्राउंड कुरूळ येथे अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात झाल्या. यंदाचे या स्पर्धांचे पाचवे वर्ष होते.

स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय खातीचे ट्रायथोलॉनपटू डॉ. महेंद्र पवार उपस्थित होते. त्यांनी त्यांचा डॉक्टर अ‍ॅथलेटिक्स हा प्रेरणादायी प्रवास या वेळी सर्वांसमोर उलगडला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. वैभव भगत यांनी सर्व डॉक्टरांना शारीरिक कसरती आणि व्यायामासाठी प्रोत्साहित केले.

स्पर्धेस संस्थेचे सर्व सदस्य व माजी अध्यक्ष डॉ. दोषी, डॉ. संदेश पाटील, डॉ. गणेश गवळी, डॉ. मयूर कल्याणी, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. आशिष भगत, डॉ. अनघा भगत, डॉ. राजेंद्र मोकल, डॉ. मकरंद आठवले आदी उपस्थित होते. या वेळी क्रिकेट, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम हे मैदानी आणि इनडोअर असे दोन्ही प्रकारचे खेळले गेले.

स्पर्धेच्या नियोजनात कमिटीचे डॉ. ओंकार पाटील, डॉ. अमेय केळकर, डॉ. अमित बेनकर, डॉ. वैजेश पाटील, डॉ. सनली नाईक, डॉ. निशिकांत ठोंबरे, डॉ. भूषण शेळके, डॉ. पल्लवी शेळके, डॉ. आदेश मोकल, डॉ. समीर धाटावकर, डॉ. अभिराज पाटील, डॉ. रश्मी गंभीर, डॉ. प्रांजली पाटील मेहनत घेतली.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com